सत्प्रवृत्तिवर्धक मंडळाची ग्रंथमाला, पुष्प पहिलें

# पायथॅगोरस स्मृति

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं.

REFBK-0006134

-अनुवादक-

कृष्णाजी विष्णु कुलकर्णी

४ भाग ८४

सत्प्रवृत्तिवर्धक मंडळाची ग्रंथमाला, पुष्प पहिलें.

१०८०१

# पायथॅगोरस स्मृति

६१३४

अनुवादक
कृष्णाजी विष्णु कुलकर्णी
भूतपूर्व मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल वार्शी.

REFBK-0006134

वृषनामसंवत्सरे शके १८६३

मूल्य आठ आणे

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

१ साधनाकार्यालय, सातारा.

२ प्रभात बोलपट, ठाणें.

मुद्रक आणि प्रकाशक

ग. वा. गोडसे, गणितविशारद, (गुजरात विद्यापीठ)

संपादक, साधना.

मुद्रण–प्रकाशन स्थल

चैतन्य मुद्रामंदिर, सातारा.

# अर्पण

पालक, शिक्षक, आणि शासनसंस्था (सरकार) धार्मिक
शिक्षणाविषयीं पूर्ण उदासीन असतांहि ज्यांचीं
व्याख्यानें वाचून हिंदु धर्माची खरी ओळख
झाली, त्या –देहानें आंग्ल पण मनानें
हिंदु अशा– ब्रह्मीभूत डॉ. ॲनी बेझंट
यांच्या पूज्य स्मृतीस

—अनुवादक

# अनुक्रमणिका


| विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| अनुवादकाचे चार शब्द | | १ |
| दिव्यसंदेश | पायथॅगोरस | १ |
| चरित्र | डॉ. ॲनी बेझंट | ३ |
| सुवर्णसूक्तें | डॅमन आणि डेमॉक्रेटीस | १ |
| वाक्सुधा | ,, ,, | ९ |
| हितबोध | डेमॉफिलस | १९ |
| उपमालंकार | ,, | २८ |
| नीतिबोध | स्टोवीअस | ३६ |
| नवनीत | सेक्स्टस ( १ ते १०२ ) | ४५ |
| | आयॅबीकस (१०३ ते ११६) | |
| लाक्षणिक बोल | पायथॅगोरस | ५८ |
| स्पष्टीकरण | अनुवादक | ६१ |

# अनुवादकाचे चार शब्द

पाश्चात्य वाङ्मयोद्यानांतून वेंचलेल्या फुलांचा हा रत्नहार महाराष्ट्रसरस्वतीच्या कंठांत घालण्याचें भाग्य लाभलें याचा मला फार आनंद वाटतो. भाषांतरद्वारां पाश्चात्य वाङ्मयगंगा आपल्या महाराष्ट्रसरस्वतीच्या प्राङ्गणांत आणून सोडण्याचें पुण्य कार्य सुशिक्षित तरुणांनीं करण्यासारखें आहे असें पाहून बारशीच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत असतां फावल्या वेळांत प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता पायथॅगोरस याच्या संप्रदायाचे निवडक वेंचे भाषांतरित करण्याचें काम मीं हातीं घेतलें व चार एक महिन्यांत तें पुरें केलें. परंतु हें पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचें आहे असें मन सांगेना. म्हणून डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें यांचा अभिप्राय काय पडतो तो पाहावा म्हणून त्यांच्याकडे माझें हस्तलिखित पाठविलें, आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्यांना हें लेखन पसंत पडलें व पुस्तकरूपानें तें प्रसिद्ध केल्यास

पन्नास रुपयांचें बक्षीस देण्याचा त्यांनीं ठरावच माझ्याकडे पाठविला !

पायथॅगोरसचे असे स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध नाहींत. पण डॅमन, आयेम्ब्लीचस, सेक्स्टस प्रभृति शिष्यवरांचें थोडेंबहुत लिखाण उपलब्ध आहे. आमच्या मन्वादि स्मृतींत नीतिव्यवहाराचें, दैनिक आचारांचें, मानवी कर्तव्यांचें व ब्रह्मसाधनमार्गाचें विवेचन असतें. तशाच स्वरूपाचें विवेचन या निवडक वेंच्यांमध्यें आहे. आणि हे वेंचे पायथॅगोरसच्या प्रत्यक्ष शिक्षणाच्या आधारावरच त्याच्या थोर शिष्यांनीं रचलेले असणार. म्हणून या ग्रंथाला पायथॅगोरस स्मृति हें यथार्थ नांव देण्यांत आलें आहे.

ही स्मृति वरवर वाचणारालाहि दिसून येईल कीं पायथॅगोरस संप्रदायावर हिंदु तत्त्वज्ञानाची व आचारविचारांची विलक्षण छाप आहे. किंबहुना हिंदूंचें तत्त्वज्ञान हें त्या संप्रदायाचें अधिष्ठानच आहे असें म्हणतां येईल. आणि ही गोष्ट हिंदूंना अत्यंत अभिमानास्पद आहे. कारण एक पाश्चात्य ज्ञानपिपासु विद्वान अडीच हजार वर्षांपूर्वींचा जीवावरचा प्रवास पतकरून हिंदुस्थानांत येतो, तेथील तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतो व तें तत्त्वज्ञान सर्वश्रेष्ठ आहे अशी खात्री होऊन परत स्वदेशीं

गेल्यावर त्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचें कार्य आमरण मनोभावें पतकरतो ही गोष्ट जशी आश्चर्याची तशी आर्य हिंदूंना अभिमानाची आहे. आर्य हिंदूंचा हा विजयध्वज तरवारीच्या धाकावर किंवा कपटनीतीवर कुठेंहि फडकला नाहीं, तर ज्याच्या बुद्धीला तो पटेल, मनाला आनंदवील व हृदयाला हलवील त्यानेंच त्याचा आपण होऊन स्वीकार केला. बाटग्यांचा धंदा करून, बाजारबुणगे लोक मिळवून धर्माची वाढ करणें हें आर्य हिंदूचें ब्रीद नाहीं. साऱ्या विश्वाला आर्यत्वाची दीक्षा देईन अशी त्याची प्रतिज्ञा आहे, पण त्यासाठीं पाशवी शक्तीचा किंवा खलनीतीचा उपयोग तो करणार नाहीं. शुद्ध सात्त्विक आचार, पवित्र प्रगल्भ विचार व सुष्ट प्रखर बुद्धि यांच्या बळांवर आर्यधर्माचा ध्वज शाश्वत फडकत राहावा अशी त्याची खरी इच्छा आहे.

असो. पायथॅगोरस स्मृतींत ग्रथित केलेले विचार हे आम्हांला नवीन नसले तरी ते सांगण्याची दिशा नवीन आहे. आणि म्हणूनच ते मराठींत उतरल्यास महाराष्ट्र सारस्वतांत पडली तर एका रत्नाची भरच पडेल, निदान त्याला उणेपणा खास येणार नाहीं असा विश्वास वाटतो. ही स्मृति केवळ वर वर न वाचतां प्रत्यहीं चार दोन वाक्यें

वाचलीं व त्यांवर मनन केलें तर अशा वाचकाचा आचार सुधारेल, त्याच्या मनाचा विकास होईल, त्याच्या बुद्धीला तेज चढेल व ऐहिक कर्तव्यें व्यवस्थित बजावण्याची किल्ली त्याच्या हातांत येईल. तुलनात्मक धर्मशास्त्राचा अभ्यास करण्याची स्फूर्ति झाल्यास तीहि सांप्रत इष्ट अशीच आहे.

फ्लॉरेन्स एम्. फर्थ या आंग्ल विदूषीच्या पुस्तकाचा या स्मृतीस आधार मिळाला म्हणून त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. तसेंच कै. डॉ. ॲनी बेझंट यांनीं 'यंग सिटिझन' मासिकांत लिहिलेलें पायथॅगोरसचें चरित्र भाषांतरण्यास अनुज्ञा दिली त्याबद्दल त्यांचाहि मी अत्यंत आभारी आहें. डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें हिनेंहि हस्तलिखित समग्र वाचून ज्या सूचना केल्या व पन्नास रुपयांचें बक्षीस देऊं केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानणें मी कर्तव्य समजतों. शेवटीं अनेक कारणांमुळें आजवर ही स्मृति छापतां आली नाहीं, पण आतां ती छापून निघाली त्याबद्दल मी ईश्वराला विनीत भावानें शरण आहें.

अनंतचतुर्दशी शके १८६३ } कृ. वि. कुलकर्णी
ठाणें

ग्रं. ७४४
१०४०१
६१३४

# दिव्य संदेश

राष्ट्रासंबंधीं राष्ट्रांतील नागरिकांची काय भावना असावी हें मुलांनो, नीट ऐकून घ्या. पिता अथवा माता, पति अथवा जाया, पुत्र अथवा मित्र यांच्यापेक्षां राष्ट्र श्रेष्ठ आहे. राष्ट्र हें सर्वांचा मायबाप आहे. तें स्त्रीचा पति व पुरुषाची पत्नी आहे. कुटुंबसंस्था ही उत्तम आहे व स्त्रीपुत्रांपासून पुरुषाला मिळणारा आनंदहि तसाच. पण राष्ट्र हें उत्तमतर आहे. राष्ट्र हें सर्वांचा संरक्षक आहे. तें नसेल तर घराचा विध्वंस व सत्यानाश होईल. उत्तम पुरुषाला जन्मदात्र्या आईचा मान प्रिय असतो; जिचीं मुलें पायांना मिठी घालतात त्या पत्नीची अब्रू ही पुरुषाला प्रिय असते; पण जें बायकामुलांना सुरक्षित ठेवतें तें राष्ट्र त्याला प्रियतर वाटलें पाहिजे. तुमची भरभराट, तुमचें तेज, तुमचा सुरक्षितपणा याला आदि कारण राष्ट्र हें होय. रानटीपणा व मनुष्यत्व यांतला फरक दर्शवि-

णाऱ्या साहित्य–संगीतादि कलांची जोपासना व संवर्धन राष्ट्रांतच होतें. जर शूर पुरुष आपल्या घरासाठीं आनंदानें मरतो तर आपल्या राष्ट्रासाठीं त्यानें शतपट आनंदानें प्राणार्पण केलें पाहिजे.

सुव्यवस्थित समाज हा त्याच्या घटकांच्या सुखासाठीं व हितासाठीं असतो, आणि हें संपादण्याचें काम ज्या राष्ट्राच्या हातून होत नाहीं तें राष्ट्र स्वयंसिद्ध गुन्हेगार ठरतें. शासनसंस्था ही शासितांच्या कल्याणासाठीं असते.

—पायथॅगोरस.

# चरित्र

पायथॅगोरस या थोर ग्रीक पुरुषाचें चरित्र चांगलें बोधप्रद आहे. तें मनोरंजकहि आहे. त्याचा पिता नेसार्कोस हा एजियन समुद्रांतील सॅमो नांवाच्या बेटावर राहात असे. हें बेट निसर्गतः फार रमणीय, आणि त्यांतच चहूंकडे नील समुद्राचा कोट आणि वरती स्वच्छ नीलाकाश ! तेथील तें मनोरम सृष्टिसौंदर्य चित्रित करावें असें कोणासहि वाटलें असतें. पायथॅगोरसचा पिता हा चांगला चित्रकार होता. पण त्यानें चित्रें अशीं कधीं रंगविलीं नाहींत. रत्नांवर नाजूक आणि त्रासदायक असें कोरीव काम करण्यांतच तो आपला वेळ घालवीत असे. त्याचीं अद्भुत कौशल्याचीं कांहीं कामें भारी किंमतीचीं असून तीं आतां ब्रिटिशांच्या पदार्थसंग्रहा-लयांत जपून ठेविलीं आहेत. या असामान्य कारागिरीनें पायथॅगोरसच्या पित्यास खूप पैसा मिळून तो चांगला सधन झाला. नागरिक या नात्यानेंहि तो उच्च पातळींतला असून

लोकांत त्याला चांगला मान होता. इ. स. पू. ५९२ मध्यें त्याला एक मुलगा झाला व त्याचेंच नांव पायथॅगोरस असें ठेवून त्याला उत्तम शिक्षण द्यावयाचें असें नेसार्कीसनें ठरविलें.

या वेळीं पोलिक्रेटस हा सॅमो बेटाचा राजा होता. तो पूर्ण शुद्धचरित नव्हता तरी काव्याचा फार भोक्ता व कला-सौंदर्य जाणणारा असल्यानें त्याच्या दरबारीं चांगल्या गुणी व गुणज्ञ लोकांचा भरणा असे. याच दरबारीं पायथॅगोरस लहानाचा मोठा झाला. त्याचा पहिला गुरू हर्मोडमॉस याच्यावर त्याचें फार प्रेम होतें व त्यानें त्याच्याजवळ मोठ्या आस्थेनें अभ्यास केला. शिवाय त्याच्या पित्याची जी विद्वान् मित्रमंडळी होती त्यांच्यापासूनहि तो बऱ्याच गोष्टी शिकला असावा यांत शंका नाहीं. या मित्रगणांपैकीं अनेक्रेऑन कवीची बरीच माहिती आतां उपलब्ध झाली आहे. शिवाय पोलिक्रीटस राजाची गुणग्राहकता ऐकून फार दूरच्या प्रदेशां-तून आलेला कवि इबीकस याचीहि थोडीशी माहिती मिळाली आहे. पण पायथॅगोरसचें खरें प्रेम थिओडोरस नामक शिल्प-कारावर होतें. हा थिओडोरस कोरीव कामांत कुशल होता व खोदीव कामांतहि त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. त्यानेंच

पोलिक्रीटसला विशेष प्रसिद्धि पावलेली आंगठी करून दिली होती. थिओडरसच्या चित्रशाळेंत पायथॅगोरस तासानुतास बसे. अनुपम सौंदर्याच्या मूर्तींचे नमुने घडवीत असतां थिओडरस याचें अद्भुत कौशल्य पायथॅगोरस कुतुहलपूर्वक पाही व त्याला नाना प्रकारचे प्रश्न विचारी. थिओडरसहि त्याला सांगे कीं, आपण जीं पौराणिक देवदेवतांचीं चित्रें तयार करीत आहोंत त्यांच्याहि पलीकडे परमेश्वर आहे, तोच सर्वांचा पिता आहे, त्याच्याच ठिकाणीं सर्व जीव राहतात व त्याच्यामध्येंच अखेर ते लय पावतात. तेथूनच पुनः त्यांचा जन्म होऊन पुनः केव्हां तरी ते त्याच्याच ठिकाणीं जाऊन मिळतात.

पायथॅगोरस हा हुशार व सुंदर मुलगा होता. जी जी नामी संधि प्राप्त होई तिचा तो चांगला फायदा घेई. लवकरच सर्व अध्यापकवर्गांत सर्वांमध्यें बुद्धिमान मुलगा अशी त्याची ख्याति झाली. आम्हांला आतां जें शिक्षण मिळतें त्याच्याहून त्याचें शिक्षण निराळें होतें. प्रथमतः त्यानें त्या काळच्या पद्धतीप्रमाणें संगीत व काव्य यांचा अभ्यास केला. सप्ततारांचें वाद्य वाजविण्यास व होमरचें काव्य पाठ म्हणण्यास तो शिकला. हल्लीं होमरचा काव्यग्रंथ ज्या स्वरूपांत आहे तें स्वरूप त्याला पायथॅगोरसच्या वेळीं नव्यानेंच प्राप्त झालें होतें. संगीत व काव्य यांचा पूर्ण अभ्यास

झाल्यानंतर त्यानें गणिताचें अध्ययन सुरू केलें. त्यांत त्याला फारच गोडी वाटूं लागून त्यानें पुढें गणिताचा व्यासंग इतका वाढविला कीं लवकरच त्यानें त्या विषयांत आपल्या शिक्षकांना मागें टाकलें.

पण पुस्तकी ज्ञानानें त्याचें समाधान झालें नाहीं. प्रवासानें शिक्षणाचा जो विकास होतो त्याच्यासाठीं त्यानें देशपर्यटन करण्याचें ठरविलें. इजिप्त, फूनीशिया, खाल्डिया, पर्शिया व हिंदुस्थान या देशांतून त्यानें प्रवास केला. त्या काळींहि हिंदुस्थान हा ज्ञानाचें माहेरघर समजला जात असे व तेव्हांच्या लोकांच्या दृष्टीनें देखील तेथल्या ज्ञानाचा उगम प्राचीनतर अशा कालाच्या उदरांत गडप झाला होता; म्हणजे हिंदुस्थान हा त्या वेळींहि प्राचीनांत प्राचीन असा देश मानला जात होता. असो; पायथॅगोरसनें इजिप्तमध्यें बावीस वर्षें वास केला व तेवढ्या अवधींत तेथील भव्य देवालयांच्या पुजाऱ्यां-पासून त्यानें त्यांची गूढ विद्या मिळविली. वास्तविक हे पुजारी आपल्या विद्येस फार जपत व प्राणांतिक प्रसंग आणला तरी ती परक्यास देण्यास तयार नसत. पण पायथॅगोरसला त्यांनीं आपली सर्व विद्या दिली. यावरून 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं असा प्रत्यय येतो. ज्या ज्या ठिकाणीं पायथॅगोरस गेला तेथील श्रेष्ठ तात्त्विक

ज्ञान तो शिकला. हिंदुस्थानांतील ब्राह्मणांच्या पायांशीं बसून त्यानें त्यांची अध्यात्म विद्या आत्मसात् केली. हिंदूंच्या तत्त्वज्ञानाचें परिशीलन करून आर्यांचे कित्येक सिद्धांत त्यानें मान्य केले. पुनर्जन्म, अहिंसा, ब्रह्म वगैरे विषयांचें ज्ञान त्याला चांगलें अवगत होतें. सूत्रांवरून त्याला सिद्धांतशास्त्राचेंहि उत्तम ज्ञान झालें होतें. ब्राह्मणांच्या यज्ञविधीस विशिष्ट प्रसंगीं जीं विशिष्ट आकारांचीं कुंडें लागत त्यांतल्याच एका यज्ञकुंडाच्या रचनेवरून ' काटकोन त्रिकोणाच्या कर्णावरील चौकोनाच्या क्षेत्राबरोबर त्याच त्रिकोणाच्या भुजा व कोटी यांवरील चौकोनांचें क्षेत्र असतें हा युक्लिडच्या पहिल्या पुस्तकांतील सत्तेचाळिसावा सिद्धांत पायर्थॅगोरसनें घेतला असला पाहिजे असें कोल्हापुरचे विख्यात गणिती प्रिन्सिपाल गुरुवर्य रघुनाथ नारायण आपटे यांचें मत आहे. पायर्थॅगोरसनें पुढें जो आपला संप्रदाय काढला त्यांतील तत्त्वें बव्हंशीं हिंदूंच्या तत्त्वज्ञानाशीं जुळतीं आहेत. असो; हिंदूंचें आध्यात्मिक ज्ञान शिकल्यानंतर पायर्थॅगोरसनें ज्यू व अरब यांच्यापासूनहि जें कांहीं मिळण्यासारखें होतें तें ज्ञान मिळविलें. नंतर ब्रिटनमधील अगदीं पश्चिमेच्या टोकाला जाऊन ड्रुइडां[ द्रविडा ? ]पासूनहि त्यानें थोडें फार ज्ञान संपादन केलें.

ज्ञानसंपादनाचा एवढा दांडगा उद्योग करीतोंपर्यंत पायथॅगोरस पन्नास वर्षांचा झाला. मग मात्र मोठ्या कष्टानें मिळविलेला ज्ञाननिधि तो दुसऱ्यांस देऊं लागला. प्रथम ग्रीस, इटली व सिसीली या देशांत प्रवास करून त्यानें पुष्कळ व्याख्यानें दिलीं. ग्रीसमध्यें जीं अनेक लोकसत्ताक राज्यें होतीं तीं त्याला मुख्य मुख्य शहरीं नागरिकशास्त्रावर (civic) व्याख्यानमाला गुंफण्यास आमंत्रणें देऊं लागलीं. नॅक्सॉस (Naxos) नामक प्रख्यात शहरीं त्याचीं व्याख्यानें झाल्याच्या कांहीं खुणा अलीकडील भूसंशोधनाने स्पष्ट झाल्या आहेत. इ. स. पू. ५३० मध्यें क्रोटोना (Krotona–टारेन्टो जवळ) येथें त्यानें तत्त्वज्ञानमंदिर स्थापन केलें. त्याची शिकवण इतकी सुंदर, तर्कशुद्ध व व्यवहार्य होती कीं तिची प्रसिद्धी अल्प काळांतच दूरवर होऊन पायथॅगोरसची शाळा नैतिक शिक्षणाचें एक महान् केन्द्र बनली व तिच्या अनेक शाखा निघाल्या.

पण या जगामध्यें निंदक व मत्सरी लोक नेहमीं असतात. पायथॅगोरसचें शुद्ध आचरण व त्याची शुद्ध शिकवण त्याच्या निंदकांस खपली नाहीं. स्वतः कांहीं करावयाचें नाहीं आणि दुसऱ्यासहि करूं द्यावयाचें नाहीं, स्वतःचा अधःपात झालेला असतो म्हणून दुसऱ्याचें सदाचरण पाहवत नाहीं असे स्वैरवर्तनी निंदक त्याचे शत्रु बनले आणि पायथॅगोरस

हा केव्हांहि कोणत्याहि पक्षाचा नव्हता तरी देशाच्या राजकारणांतलें पुढारीपण त्यास पाहिजे आहे असा त्याच्या शत्रूंनीं डांगोरा पिटून धर्मवेड्या अश लोकांकरवीं सदाचाररत अशा त्याच्या अनुयायांचा छळ सुरू केला व क्रोटोना येथें स्थापन केलेलें तत्वज्ञानमंदिर जाळून भस्म केलें. निःस्वार्थीपणानें ज्यांना आपण मदत करण्यास निघालों तेच लोक आपल्या विरुद्ध उठलेले पाहून पायथॅगोरसला त्यांच्या कृतघ्नपणाचा संताप आला व उर्वरित आयुष्य शांतपणें संपवावें म्हणून तो मेटापोण्टम [ Metapontum ] येथें राहण्यास गेला. पण तेथें तो जास्तच थकला. तेव्हां सॅमो बेटांतील आपल्या वडिलार्जित शेतवाडीवर तो राहण्यास गेला आणि तेथेंच हा थोर पुरुष इ. स. पू. ४९८ मध्यें मरण पावला.

( यंग सिटीझन नामक एका जुन्या मासिकांतील कै. डॉ. ॲनी बेझंट यांच्या लेखाचा अनुवाद. )

------

# पायथॅगोरस स्मृति

## सुवर्णसूक्तें.

१ धर्मप्रणीत जे अमर देव त्यांची पूजा करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे.

२ धर्माज्ञा पालन करणें आणि पुण्यशील व ज्ञानशील विभूतींविषयीं पूज्यबुद्धि ठेवणें हें दुसरें कर्तव्य आहे.

३ त्याचप्रमाणें पितर आणि संतमहात्मे यांची उपासना करणें हें तिसरें कर्तव्य आहे.

४ तसेंच आपले मातापितर व जवळच्या नात्याचे लोक यांचा सन्मान करणें हें चवथें कर्तव्य आहे.

५ आणि इतर सर्व मनुष्यांतून ज्या मित्राची निवड करावयाची तो सद्गुणांनीं प्रतिष्ठा पावलेला असावा.

६ त्यानें केलेला कळकळीचा उपदेश ऐकून घ्या आणि त्याच्या सदाचाराचा आदर्श पुढें ठेवा.

७ क्षुल्लक अपराधाबद्दल मित्राचा द्वेष करणें शक्य तितकें सोडून द्या.

८ (आणि लक्षांत ठेवा कीं,) गरजेंतूनच सामर्थ्य निर्माण होतें.

९ मी या गोष्टी जशा तुम्हांस सांगितल्या तशाच त्या आहेत असा पक्का विश्वास ठेवा; आणि पुढील मनोविकार जिंकण्याचा व ते नष्ट करण्याचा सतत प्रयत्न करा.

१० खादाडपणा, आळस, काम आणि क्रोध.

११ उघडपणें असो वा गुप्तपणें असो, असत्कर्म करूं नका.

१२ पण सर्वांपेक्षां अगोदर स्वाभिमानाला जपा.

१३ नंतर आपल्या वाचेंत आणि क्रियेंत सत्य पाहात जा.

१४ आणि कोणत्याहि गोष्टींत नियम नाहीं व विचार नाहीं असें वागण्याची संवय लावून घेऊं नका.

१५ पण नेहमीं अंतःर्मुख होऊन विचार करीत जा कीं मरण हें कोणालाच चुकत नाहीं.

१६ तसेंच लक्ष्मी चंचल आहे. जशी ती मिळवितां येते तशी ती नाहींशीहि होते.

१७ जीं आधिदैविक दुःखें मनुष्यांना भोगावीं लागतात त्यांसंबंधीं इतकेंच सांगावयाचें कीं,

१८ जो आपला दैवायत्त भोग आहे—मग तो कितीहि खडतर असो— तो धीरानें भोगा; आणि त्याबद्दल कधींहि कुरबुर करूं नका.

१९ पण आपल्या हातून होईल तितका त्याचा परिहार करण्याचा प्रयत्न करा.

२० आणि असा विचार मनांत आणा कीं, दैवायत्त भोगाचा सर्वांत मोठा भाग कांहीं सज्जनांच्या वाट्यास येत नाहीं.

२१ लोकांमध्यें योग्य व अयोग्य अशा विचारसरणींचे अनेक प्रकार आहेत.

२२ पण त्यांचा सहज स्वीकार करूं नका किंवा अव्हेरहि करूं नका.

२३ पण असत्याची मालिकाच जर कोणी पुढें केली तर ती शांतपणें ऐकून घ्या व अंगांत धीराचें कवच घाला.

२४ प्रत्येक प्रसंगीं कसें वागावें यासंबंधीं मी जें तुम्हांस आतां सांगणार आहे तें नीट लक्षांत आणा.

२५ कोणाच्याहि शब्दाला वा करणीला भुलून जाऊं नका.

२६ किंवा जें आपल्या हिताचें नाहीं तें बोलण्याचा अगर आचरण्याचा मोह पडूं देऊं नका.

२७ आपल्या हातून वेडगळपणाचीं कृत्यें होऊं नयेत म्हणून प्रत्येक कर्म करण्यापूर्वी प्रथम विचार ध्या आणि विचार करा.

२८ कारण विचार केल्याशिवाय बोलणें वा एखादें कृत्य करणें हें नादान मनुष्याचें काम होय.

२९ पण असेंच काम करा कीं ज्यामुळें मागाहून रडत बसण्याचा अगर पश्चात्तापानें पोळण्याचा प्रसंग येणार नाहीं.

३० जें समजत नाहीं तें करण्याच्या फंदांत पडूं नका.

३१ पण जें जें ज्ञान आवश्यक आहे तें तें संपादन करा, म्हणजे तुमचें आयुष्य फार सुखाचें जाईल.

३२ कांहीं झालें तरी शरीराची हेळसांड करूं नका.

३३ तर त्याला योग्य प्रमाणांत अन्न, पान व जरूर तेवढा व्यायाम द्या.

३४ योग्य प्रमाण म्हणजे ज्यानें तुम्हांला अपाय होणार नाहीं तें.

३५ ऐषआराम नाहीं अशी पण ठाकठिकीची व शोभेलशी राहणी ठेवण्याची संवय लावून घ्या.

१०५०१

३६ ज्या गोष्टी मत्सराला कारणीभूत होतील त्यांचा अव्हेर करा.

३७ शोभेल काय व सन्मानार्ह काय हें ज्या मनुष्याला कळत नाहीं त्याच्यासारखी अप्रासंगिक उधळपट्टी करूं नका.

३८ लोभी वृत्ति जशी त्याज्य तशी कंजूष वृत्तीहि त्याज्यच; तेव्हां या कामीं योग्यायोग्यता पाहणें हेंच उत्तम.

३९ अशाच गोष्टी करा कीं ज्या तुम्हांला अपाय करणार नाहींत; आणि ज्या गोष्टी करावयाच्या त्या विचार-पूर्वकच करा.

४० निजण्यासाठीं बिछान्यावर अंग टाकलें कीं लगेच निद्रावश होऊं नका.

४१ तर आधीं आपण दिवसा केलेल्या कृत्यांचें बुद्धि-पूर्वक परीक्षण करा.

४२ आपण काय केलें, कुठें चुकलों, काय करावयाला पाहिजे होतें?

४३ या परीक्षणानंतर जर स्वतःचें गैरवाजवी वर्तन निदर्शनास येईल तर त्याबद्दल स्वतःचा कडकपणें निषेध करा.

४४ आणि जर कांहीं चांगल्या गोष्टी घडल्या असतील तर त्याबद्दल आनंद माना.

४५ या गोष्टींची चांगली संवय लावून घ्या; त्यांचें चांगलें चिंतन करा; तुमची त्यांच्यावर खरी निष्ठा असली पाहिजे.

४६ म्हणजे या गोष्टीच तुम्हांला दैवी संपत्तीच्या मार्गावर आणून सोडतील.

४७ जी विश्वाचें मूळ आहे व जिचें साध्य सनातन आहे त्या पवित्र चतुःसूत्रीचा प्रकाश ज्यानें आमच्या जीवात्म्यावर पाडला त्याच्या शपथेवर आम्ही हें सांगतों.

४८ आपलें उद्दिष्ट सफल व्हावें एतदर्थ देवाची प्रार्थना केल्याशिवाय कोठल्याहि कामाला हात लावूं नका.

४९ ही संवय तुमच्या अंगीं पूर्णपणें बाणली म्हणजे,

५० अमर देव व (मर्त्य) माणसें यांची प्रकृति तुम्हांला कळूं लागेल.

५१ आणि भिन्न भिन्न जीवांची धाव किती, त्यांचें सामर्थ्य व गुणधर्म काय, ते कशानें एकत्र जखडले जातात यांचेंहि ज्ञान तुम्हांला होईल.

५२ त्याचप्रमाणें सृष्टिनियमानुसार प्रकृतिधर्म हा सर्वांचे ठायीं सारखाच आहे हेंहि तुम्हांला समजेल.

५३ म्हणजे मग ज्याची इच्छा करणें योग्य नाहीं त्याची इच्छा तुम्हांला होणार नाहीं; आणि सारें जग तुमच्याकडे चालून येईल.

५४ तसेंच तुम्हांला हेंहि समजून येईल कीं माणसें हीं आपलीं दुःखें आपणच आपल्या इच्छेनें आणि आवडीनें आपणांवर ओढून घेतात.

५५ दुर्दैवीच ते! आपलें सुख आपल्याजवळच आहे हें त्यांना दिसत नाहीं व कळतहि नाहीं.

५६ दुर्दैवाच्या फेऱ्यांतून मुक्त कसें व्हावें हें फारच थोड्यांना समजलें.

५७ मनुष्यांना अंध बनवून त्यांना मोहून टाकणारें दैव हें असें आहे!

५८ यामुळें मनुष्यें असंख्य दुःखांनीं त्रस्त होऊन अजस्र लंब गोलाप्रमाणें तीं एकसारखीं पुढें मागें भ्रमण करतात.

५९ कारण त्यांना वर फेकण्याचा व खालीं ओढण्याचा दैवाचा खेळ जन्मापासून त्यांच्या पाठीस लागला आहे; पण तो खेळ त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

६० दैवाला डिवचून चेतविण्यापेक्षां नमतें घेऊन त्याला टाळणें हेंच उचित होय.

६१ हे जगत्पित्या, परमेश्वरा! गांजणाऱ्या सर्व आपत्तींतून मनुष्यांना मुक्त करणार असशील तर—

६२ त्यांच्या जीवात्म्याची त्यांना ओळख करून दे.

६३ पण धैर्य सोडूं नका; मनुष्य हा ईश्वराचा अंश आहे.

६४ शुद्ध वृत्तीनें त्याला मोठीं गूढ रहस्यें समजून येतात.

६५ जर शुद्ध वृत्तीनें आपलीं रहस्यें तुम्हांला सांगितलीं तर मी तुम्हांकरितां नियुक्त केलेल्या सर्व गोष्टी तुम्ही सहज करूं शकाल.

६६ आणि तुमच्या जीवात्म्याची तळमळ निवाली म्हणजे तुम्ही त्याची सर्व संकटांतून व दुःखांतून मुक्तता करूं शकाल.

६७ पण जीवात्म्याच्या शुद्धीसाठीं व मुक्तीसाठीं ज्या गोष्टी आम्हीं तुम्हांला वर्ज्य म्हणून सांगितल्या आहेत त्यांच्या-पासून दूर रहा.

६८ त्यांच्यामधील योग्य तारतम्य पहा व सर्व गोष्टींचें चांगलें परीक्षण करा.

६९ ईश्वरदत्त जी बुद्धि तिला तुम्ही आपली मार्गदर्शक व चालक बनवा; कारण तिच्याच हातीं लगाम पाहिजे.

७० आणि तुम्ही आपल्या मर्त्य शरिराचा त्याग करून जेव्हां नितान्त शुद्ध अशा आकाशांत याल,

७१ तेव्हां तुम्ही नित्य व शुद्ध असा ईश्वर व्हाल आणि मग मृत्यूचा अधिकार तुमच्यावर चालणार नाहीं.

# पायथॅगोरस स्मृति

## वाक्सुधा.

१ जो कोणीं या वाक्सुधेचें मनन करील त्याला नरजन्माला योग्य अशा पुष्कळ गोष्टींची प्राप्ति होईल आणि अनुचित अशा पुष्कळ गोष्टींपासून तो मुक्त होईल.

२ जीवात्मा पूर्णत्व पावला तर देहाचे दुर्गुण नाहींसे होतील; पण विचारशक्तिविरहित असें देहाचें सामर्थ्य मात्र जीवात्म्याचें काडीमात्र कल्याण करूं शकत नाहीं.

३ ज्याला आत्म्याची संपत्ति आवडते त्याला विशेष दैवी गोष्टीहि आवडूं लागतील. पण जो त्याच्या नश्वर निवासस्थानाच्या [ देहाच्या ] संपत्तीची आवड धरतो त्याला मानुषी गोष्टीच आवडूं लागतील.

४ अनीतिमान माणसाला मोडता घालणें हें चांगलें; पण हें शक्य नसेल तर त्याच्या संगतीनें कांहीं न करणें हेंच उत्तम.

५ दिखाऊ भलेपणापेक्षां भलेपणा हा स्वभावच बन-विणें अवश्य आहे.

६ मनुष्याचें सुख हें देहांत वा संपत्तींत नाहीं; तर तें नीति व सदाचार यांत आहे.

७ पापापासून दूर राहावें; पण भीतीनें नव्हे तर तें योग्य आहे म्हणून.

८ संकटप्रसंगीं योग्य तो शहाणपणा ठेवणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

९ वाईट कर्म केल्याचा पश्चात्ताप होणें हें जीवनाचें संरक्षक आहे.

१० सत्याचा वक्ता होणें अगत्याचें आहे; वाचाळ होणें नव्हे.

११ ज्याच्यावर आघात केला जातो त्याच्यापेक्षां जो आघात करतो तो अधिक दुःखी होय.

१२ दुसऱ्याचे अपराध शांतपणें सहन करणें हें थोर पुरुषच करूं जाणोत.

संग्रं ७४४
१०८०७



१३ कायदा, राजा, अगर आपल्यापेक्षां सूज्ञ मनुष्य यांच्या विरुद्ध न जाणें हें बरें.

१४ सज्जन मनुष्य हा दुर्जनाच्या शब्दप्रहारांकडे लक्ष देत नाहीं.

१५ आपण होऊन दुर्जनाच्या नियंत्रणाखालीं राहणें कठिण होय.

१६ जो संपत्तीच्या पूर्ण आहारीं गेला आहे तो कधींच नीतिमान होणार नाहीं.

१७ द्रव्यापेक्षां बुद्धि ही पुष्कळदां मन वळविण्याचे कामीं अधिक समर्थ असते.

१८ आपण शहाणे आहोंत अशी ज्याची कल्पना झाली आहे त्याला उपदेश करणें हें पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखें आहे.

१९ युक्तिबुद्धिपूर्वक वाद करण्यास शिकलेले नाहींत असे पुष्कळ लोक असतात; तथापि त्यांची राहणी मात्र युक्तिबुद्धीला धरूनच असते.

२० नीचांतलीं नीच कृत्यें करणारे देखील पुष्कळदां उत्कृष्ट प्रवचन करतात.

२१ संकटाचा अंकूश टोंचला म्हणजे मूर्ख देखील केव्हां केव्हां शहाणे होतात.

२२ नीतीची संपादणी व उद्योग यांची ईर्षा धरणें आवश्यक आहे; नीतीच्या बडबडीची नव्हे.

२३ जीं स्वाभाविक सत्प्रवृत्तीचीं माणसें असतात त्यांना हितावह गोष्टी कोणत्या तें कळतें आणि ते त्यांचीच कास धरतात.

२४ शारीरिक शक्ति व जोम ही पाशवी श्रीमंती; पण मानवी श्रीमंती म्हणजे प्रामाणिक वर्तन.

२५ पूर्व अभ्यासाशिवाय कला किंवा ज्ञान यांचा लाभ होणें नाहीं.

२६ दुसऱ्याच्या चुकांना बोल लावण्यापेक्षां तो आपल्याच चुकांना लावणें अधिक चांगलें.

२७ ज्यांची वागणूक चांगली व्यवस्थित आहे त्यांचें जीवनहि व्यवस्थित राहील.

२८ प्रत्यक्ष अपाय करण्यापासून परावृत्त होणें एवढेंच नव्हे तर तशी इच्छाहि मनांत न आणणें चांगलें.

२९ चांगल्या कृतीची स्तुति करणें हें योग्य आहे; हीन कर्माची स्तुति करणें हें कपटी व भोंदू माणसाचें लक्षण आहे.

३० पांडित्य आहे पण ज्ञान नाहीं असे पुष्कळ लोक असतात.

३१ ज्ञानसमृद्ध होण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे.

३२ कर्मोत्तर पश्चात्तापापेक्षां कर्मपूर्व विचार घेणें चांगलें.

३३ सर्वच माणसांवर विश्वास ठेवूं नका. तर जे योग्य असतील त्यांच्यावर ठेवा. कारण पहिलें मूर्खाचें तर दुसरें शहाण्याचें काम होय.

३४ बरीं वाइट माणसें पारखून घ्यावयाचीं तीं त्यांच्या केवळ कर्मावरून नाहीं, तर त्यांच्या हेतूवरूनहि.

३५ अमर्याद अभिलाष धरणें हा मुलाचा स्वभाव; जाणत्याचा नव्हे.

३६ भलत्याच वेळचे सुखोपभोग दुःखाला जन्म देतात.

३७ कोणत्याहि एका गोष्टीची जबर लालसा मनुष्याला इतर गोष्टींत अंध बनविते.

३८ निरुपद्रवी राहून चांगल्या गोष्टीची तीव्र आकांक्षा धरतें तें प्रेम.

३९ जें हिताचें नाहीं तें सुखाचें आहे असें समजूं नका.

४० मूर्खाचे शासक होण्यापेक्षां त्याच्या म्हणण्याप्रमाणें ऐकणें एक वेळ पुरवलें.

४१ विपत्ति ही मुलांचा गुरु होय; तार्किक विवरण नव्हे.

४२ शहाणपणाशिवाय संपत्ति आणि वैभव हीं सुरक्षित मालमत्ता नव्हत.

४३ संपत्ति मिळविणें वावगें नाहीं हें खरें; पण ती अन्यायानें मिळविणें ही मात्र सर्वांत वाईट गोष्ट आहे.

४४ वाईटाचें अनुकरण करणें आणि चांगल्याचें अनुकरण करण्यास तयार नसणें हें फार भयावह होय.

४५ दुसऱ्याचीं कामें करीत असावयाचें; पण आपल्या स्वतःच्या कामाविषयीं मुळींच माहिती नसावयाची ही फार लज्जेची गोष्ट आहे.

४६ काम करण्याचा नेहमीं बेत करीत बसणें म्हणजे काम अपुरें ठेवणेंच होय.

४७ कपटीं व दिसावयाला तेवढीं चांगलीं अशीं माणसें जें काय करावयाचें तें बोलण्यांत करतात पण प्रत्यक्ष कृतींत मात्र आवळ्याएवढें पूज्य !

४८ संपत्ति आणि ज्ञान हीं दोन्हीं ज्याला प्राप्त झालीं आहेत, तो मनुष्य खरोखरच धन्य होय. कारण तो योग्य ठिकाणींच त्यांचा उपयोग करील.

४९ चांगलें काय हें कळत नाहीं म्हणून चुका होतात.

५० वाईट गोष्ट करण्यापूर्वी मनुष्यानें स्वतःकडे पूज्य वृद्धांनें पहावें.

५१ क्षुल्लक गोष्टींकडे फार लक्ष देणारा आणि विरोधशील मनुष्य हा स्वभावतःच ज्ञानार्जनासाठीं मिळतें घेण्यास तयार नसतो.

५२ एकसारखें स्वतः बोलत राहणें पण दुसऱ्याचें ऐकून घेण्यास तयार नसणें हें दर्पाचें एक लक्षण आहे.

५३ नीतिभ्रष्ट मनुष्यापासून जपून राहणें आवश्यक आहे; नाहीं तर तो संधि साधण्यास कमी करणार नाहीं.

५४ मत्सरी मनुष्य हा जसा प्रतिपक्षाला तसा स्वतःलाहि त्रासदायक होतो.

५५ जो अन्यायानें वागतो तोच तेवढा शत्रू नव्हे; जो तसें वागण्याचें मनांत आणतो तोहि शत्रूच होय.

५६ परकीयांच्या वैरापेक्षां स्वकीयांचें वैर हें फार भयंकर असतें.

५७ सर्वांशीं संशयातीत वृत्तीनें वागा; आणि प्रसंग पाहून वर्तणें व सावधानता ठेवणें हे गुण आचरणांत आणा.

५८ आहेराचा स्वीकार करणें रास्त आहे; पण तो स्वीकारतांना उलट आहेर अधिक मोलाचा करीन असा निश्चय असावा.

५९ देणगी देण्यापूर्वीं ती कोणाला द्यावयाची तें पहा.

नाहीं तर तो कपटी मनुष्य असेल तर उपकाराची फेड अपकारानें व्हावयाची.

६० योग्य प्रसंगीं केलेले क्षुल्लक उपकार हे उपकृत मनुष्याला फार महत्त्वाचे वाटतात.

६१ सुज्ञांचा सन्मान केल्यानें मोठ्या गोष्टी साधणें शक्य असतें. मात्र आपला सन्मान झाला असें त्यांना वाटलें पाहिजे.

६२ ज्याची प्रत्युपकाराकडे दृष्टि असत नाहीं पण चांगलें करण्याचीच ज्याची अंतःकरणापासून इच्छा असते तोच खरा उपकारशील मनुष्य होय.

६३ पुष्कळ लोक मित्रांप्रमाणें वाटतात पण ते तसे असत नाहींत; दुसरे मित्रांप्रमाणें वाटत नाहींत पण ते तसे असतात.

६४ एकाच पण शहाण्या मनुष्याची मैत्री ही सहस्र मुर्खांच्या मैत्रीपेक्षां चांगली.

६५ ज्याला एकहि लायक मित्र नाहीं तो जगण्यासहि लायक नाहीं.

६६ आपले मित्र रावांचे रंक झाले म्हणून त्यांचा त्याग करणारे पुष्कळ लोक असतात.

६७ प्रत्येक गोष्टींत वाजवीपणा हा चांगला; त्यांत न्यूनता किंवा अतिरेकहि असूं नये.

६८ जो कोणावरहि प्रेम करीत नाहीं त्याच्यावर कोणी प्रेम करीत असेल असें मला वाटत नाहीं.

६९ जो विनोदी आहे व ज्याच्याजवळ मनोरंजक कुळकथांचें पेंव आहे असा वृद्ध मनुष्य संगतीला गोड वाटतो.

७० ज्ञानाची जोड नसेल तर शरीरसौंदर्य हें केवळ पशूला शोभणारें होय.

७१ संपत्काळीं मित्र मिळणें फार सोपें; पण विपत्काळीं तीच गोष्ट सर्वांत कठिण असते.

७२ सारे संबंधी हे कांहीं मित्र नव्हत; तर परस्परांच्या हितसंबंधांत ज्यांचें जमतें तेच मित्र होत.

७३ आपणहि मनुष्यच आहोंत; म्हणून मनुष्यांवर येणाऱ्या संकटांना न हसतां त्यांबद्दल दुःखित होणेंच उचित होय.

७४ लक्षपूर्वक पाहिलें तरी चांगलें क्वचितच दिसतें; पण वाईट मात्र आपोआप दृष्टीस पडतें.

७५ परनिंदा करण्यांत ज्यांना आनंद वाटतो त्यांना मैत्री करणें जमत नाहीं.

७६ स्त्रियांचे अंगीं वाचाळता असूं नये; कारण ती फार भयावय आहे.

७७ स्त्रीच्या अंकित राहणें म्हणजे पराकाष्टेचा उन्माद आणि मित्रेपणा होय.

७८ जें सुंदर आहे त्याचेंच नेहमीं लक्षपूर्वक चिंतन करणें हें देवमाणसाचें लक्षण आहे.

७९ देव सर्वज्ञ आहे असें मानणारा मनुष्य उघड वा गुप्त पाप करणार नाहीं.

८० मूर्खांची स्तुति करणें म्हणजे त्यांची हानि करणेंच होय.

८१ आपली आपण स्तुति करण्यापेक्षां ती दुसऱ्यानें करणें चांगलें.

८२ आपली जी स्तुति होते तीस आपण पात्र नाहीं असें वाटत असेल तर ती खुशामत आहे असें समजा.

८३ जग म्हणजे नाटकांतील एक प्रवेश आहे; आयुष्य क्षणभंगुर आहे. तुम्ही आला, तुम्हीं पाहिलें, तुम्ही निघून गेला.

८४ जग चंचल आहे; प्रपंच लटका आहे.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ६१३४

# पायथॅगोरस स्मृति

## हितबोध.

१ प्राप्त झाल्या असतां राखतां येणार नाहींत अशा वस्तू देवाजवळ मागूं नका; कारण देवाचें देणें केव्हांहि कोणास हरण करतां येत नाहीं; आणि म्हणूनच ज्याचें रक्षण तुम्हांला करतां येणार नाहीं तें देव तुम्हांला मुळीं देणारच नाहीं.

२ आपली बौद्धिक बाजू नीट संभाळा; कारण बौद्धिक निद्रेचें मरणाशीं सादृश्य आहे.

३ ईश्वर मनुष्यांना संकटांत घालतो तें तो क्रोधवश होतो म्हणून नव्हे, तर माणसांची शुद्धि व्हावी म्हणून. ईश्वर क्रोधातीत आहे; कारण क्रोध म्हणजे इच्छेविरुद्ध होणाऱ्या गोष्टीचा परिणाम; आणि ईश्वराच्या इच्छेविरुद्ध तर कांहींच होत नाहीं.

४ एकाद्याचें वाईट करावें अगर न करावें याबद्दल जेव्हां तुम्ही विचार करूं लागतां तेव्हां जें वाईट करण्याचें तुम्ही मनांत आणतां तें प्रथम तुम्हांलाच भोगावें लागेल. शिवाय वाईट करून चांगल्याची तुम्ही आशाच करूं नये; कारण प्रत्येकाची चालरीत ही त्याच्या राहणीला व करणीला अनुरूप अशीच असते. प्रत्येकाचें अंतर्याम हेंहि एक भाण्डारच आहे. अंतर्याम चांगलें असेल तर भाण्डारहि चांगल्या वस्तूंचें असतें; तें वाईट असेल तर भाण्डारहि वाईट विचारांनीं भरलेलें असणार.

५ प्रथम चांगला विचार करा आणि मगच जें काय बोलावयाचें वा करावयाचें तें बोला अथवा करा; कारण बोललेले शब्द व केलेलें कर्म परत घेण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं नाहीं.

६ ईश्वर शब्दाला महत्त्व देत नाहीं, तर सुज्ञांच्या कृतीला देतो; कारण सुज्ञ मनुष्य हा मूकवृत्ति असतांना देखील देवाला भजत असतो.

७ वाचाळ व अज्ञ मनुष्य हा प्रार्थनेच्या व यज्ञाच्या अशा दोन्ही प्रसंगीं दैवी प्रकृतीस दूषित करतो. म्हणून ज्ञानी मनुष्य हाच काय तो एक उपाध्याय व देवासखा होय. त्यालाच फक्त प्रार्थना कशी करावी तें समजतें.

८ या लोकीं नागवेंच जन्माला घातलें म्हणून शहाण्यानें जन्मदात्याची नागवीच प्रार्थना करावी; कारण अयोग्य विषयांच्या ओझ्याखालीं जो वांकला नाहीं त्याचीच प्रार्थना तेवढी ईश्वराला ऐकूं जाते.

९ सद्गुणांहून मोठी अशी अन्य देणगी देवापासून मिळणें अशक्य आहे.

१० नैवेद्य आणि बलिदान यांनीं देवाची पूजा होत नाहीं; देवालयांत टांगलेल्या वस्तूंनींहि त्याचा शृंगार होत नाहीं. तर ईश्वरी प्रेरणा झालेला महात्माच देवाची खरी भेट करून देतो. तुल्य रूपानेंच तुल्य रूपाला जाऊन मिळावें लागतें.

११ जुलमी सुलतानाच्या आधीन राहण्यापेक्षां मनोविकारांच्या आधीन राहणें अधिक दुःखदायक होय.

१२ दुसऱ्यांशीं चर्चा करण्यापेक्षां स्वतःशीं चर्चा करणें जास्त चांगलें.

१३ तुमच्या जीवानें वा देहानें वाटेल त्या ठिकाणीं वाटेल तें कर्म केलें तरी तुमच्या आचाराचा परीक्षक म्हणून परमेश्वर हा तेथें उपस्थित असतोच असतो एवढें लक्षांत ठेवण्याची तुम्ही जर दक्षता घ्याल, तर ज्याच्यापासून कांहींच

गुप्त राखतां येत नाहीं अशा सर्वसाक्षी व सर्वव्यापी परीक्षकाचा तुम्ही आपल्या प्रत्येक उच्चाराच्या व आचाराच्या वेळीं आदर कराल; आणि तेव्हांच जीवींचा सखा या नात्यानें परमेश्वराचें सान्निध्य तुम्हांला खचित लाभेल.

१४ स्वतःसंबंधीं तुमचें जितकें अज्ञान असेल तितक्या प्रमाणांत तुम्ही क्रोधवश व्हाल आणि मूर्खासारखें वागाल एवढी खूणगांठ बांधून ठेवा.

१५ आपल्या मृत्यूनंतरहि जीं बायकामुलें एकनिष्ठ राहूं शकतील अशांच्याच प्राप्तीचा प्रयत्न करणें आवश्यक आहे.

१६ दारिद्र्याचा अंगीकार केलेला तृप्तात्मा हा खरोखर देवाप्रमाणेंच राहतो; बाह्य व अनावश्यक जिनगीचा अभाव हीच सर्वांत मोठी संपत्ति आहे असें तो मानतो. कारण संपत्तीनें तृष्णा भडकते. कोणत्याहि बाबतींत वाममार्गानें न जाणें ही एकच गोष्ट सुखी जीवनाचा आनंद चाखावयास पुरेशी आहे.

१७ खरी संपत्ति ही चैनीच्या संवयींनीं केव्हांच मिळत नाहीं.

१८ जें दुसऱ्याला दिल्यानें आपल्यापाशींहि वाढतच जातें तेंच सर्वोत्कृष्ट आहे असें समजा.

१९ तुमच्या देहापेक्षां जे तुमच्या आत्म्याला साहाय्यभूत होतात तेच तुमचे खरे मित्र हें लक्षांत ठेवा.

२० मूर्ख मनुष्यानें केलेली स्तुति वा निंदा ह्या दोन्हीहि हास्यास्पद असून अज्ञ मनुष्याचें सारें आयुष्य म्हणजे एक कलंकच आहे असें समजा.

२१ तुमची परिचित मंडळी तुम्हांला वचकून राहण्यापेक्षां ती तुमच्याकडे आदरानें पाहतील अशाविषयीं प्रयत्न करा; कारण प्रेम हा आदराचा व द्वेष हा भीतीचा अनुचर आहे.

२२ अज्ञ लोकांनीं दिलेले बली हे अग्नीचा आहार तरी होतात; पण ज्या वस्तू देवाला वाहिल्या म्हणून देवालयांत टांगून ठेवतात त्या तर धर्मादायाच्या चोरीचा माल होत.

२३ लक्षांत ठेवा कीं कपटाचा व्यवहार हा फार वेळ गुप्त राखतां येत नाहीं.

२४ चाबकाच्या माराखालीं कातडी सोलली जात असतां अपराधी मनुष्याला जितक्या वेदना होतात, त्यांच्यापेक्षां फार भयंकर अशा वेदना, मनुष्य जेव्हां अपराधाच्या जाणीवेनें तळमळतो, तेव्हां सोशीत असतो.

२५ पाखंडी मनुष्यापुढें ईश्वरावर पुराण सांगणें सुरक्षित-

पणाचें नाहीं; कारण गोष्टी खऱ्या असोत वा भ्रामक असोत, त्या अशा माणसाजवळ सांगणें सारखेंच भयावह असतें.

२६ न्यायबुद्धीला प्रत्येक बाबतींत आपली मार्गदर्शिका केल्यानें तुमच्या हातून अपराध होण्याचें टळेल.

२७ आपण दुसऱ्याला त्रासदायक झाल्यास आपला त्रास सहसा चुकणार नाहीं.

२८ ज्या ज्ञानाच्या जोरावर मूर्खांमधील ज्ञानाचा अभाव सहन करतां येईल तें ज्ञान दांडगें असें समजा.

२९ जो भ्रष्टचरित आहे तो ईश्वरी कायद्याकडे लक्ष देत नाहीं आणि म्हणून तो ' बंधनाच्या पलीकडे ' राहतो.

३० नीतिमान मनुष्य हा परका असला तरी तो नागरिक बंधूपेक्षां श्रेष्ठ होय; इतकेंच नव्हें तर तो आप्तजनापेक्षांहि श्रेष्ठ होय.

३१ जितके म्हणून मनुष्याचे विकार आहेत तितके सारे हुकूमशहाच होत.

३२ ज्यानें आत्मसाम्राज्य संपादन केलें नाहीं तो खरा स्वतंत्र नव्हेच.

३३ प्रथम ब्रह्मचर्ययुक्त तपश्चर्या आणि मग फलप्राप्ति.

३४ तुमच्या विवेचक बुद्धीच्या भेदक दृष्टीनें ज्यांची

किंमत शून्य आहे अशा वस्तू तुमच्या संपत्तींत येत नाहींत हें मनावर बिंबवून घ्या.

३५ तुमच्या परीक्षक बुद्धीला जें सरळपणाचें व सुंदर वाटेल तें केल्यावाचून राहूं नका; मग तें करण्यानें तुम्हांला मोठेपणा मिळाला नाहीं तरी चालेल. कारण सुंदर कृत्यांचें परीक्षण करण्यास दुष्ट लोक अपात्र असतात.

३६ मनुष्याची पारख करावयाची ती त्याच्या बोलण्यावरून करण्यापेक्षां त्याच्या कृतीवरून करा; कारण पुष्कळ लोक अनाचारानें वागतात, पण त्यांचें बोलणें मात्र गोड असतें.

३७ महत्कार्यें संपादा; पण तत्संबंधीं वचनें मात्र देऊं नका.

३८ देवापासूनच आमची निर्मिति आहे. त्याच्याच ठिकाणीं आमच्या प्रकृतीचीं मुळें निगडित आहेत, आणि म्हणूनच आपण आपल्या मुळाला घट्ट धरून राहिलें पाहिजे; कारण पाण्याचे प्रवाह व झरे हे त्यांचें मूळ नष्ट केलें तर आटतात व कोरडे ठणठणीत पडतात.

३९ संयम हेंच आत्म्याचें सामर्थ्य होय; कारण निर्विकार आत्म्याचा संयम हाच प्रकाश आहे. म्हणून असंयमानें आत्म्याला कलंकित करण्यापेक्षां मरण पत्करणें फार चांगलें.

४० जो आपल्या इष्टमित्रांवर, मुलांमाणसांवर अगर दुसऱ्या कोणत्याहि चंचल व पदभ्रष्ट जीवांवर अवलंबून आहे तो मनुष्य सुखी आहे असा छाप तुम्हांला सहसा मारतां येणार नाहीं; कारण हे सारे अशाश्वत व अस्थिर आहेत; पण स्वावलंबन व देवाधीनता यांत मात्र बळकटी व चिरस्थायित्व आहे.

४१ शारीरिक सुखासाठीं लोक जितके परिश्रम करतात तितके परिश्रम आत्मकल्याणार्थ तपश्चर्या कशी करावी हें अभ्यासण्यांत जो घेतो तो मनुष्य शहाणा व देवाचा आवडता होय.

४२ शासकाला व तत्सम लोकांना सर्व कांहीं देऊन टाका; पण आपलें स्वातंत्र्य तेवढें देऊं नका.

४३ वार्धक्यांत देहाच्या गरजा पुरवील अशा संततीपेक्षां जी शाश्वत अन्नानें आत्म्याचें पोषण करील अशी चिरंजीव संतति कशी निर्माण करतां येईल, याचें ज्ञान करून घ्या.

४४ एकच मनुष्य हा विलासासक्त, देहासक्त, द्रव्यासक्त आणि त्याचबरोबर ईश्वरासक्त असणें अशक्य आहे. कारण विलासासक्त मनुष्य हा देहासक्त असतो; आणि देहासक्त मनुष्य हा सर्वस्वीं द्रव्यासक्त असतो. द्रव्यासक्त मनुष्य हा

अनीतिमान असतोच; आणि जो अनीतिमान असतो तो देवाचा अनादर करणारा असतो आणि त्याचें वागणें 'बंधनापलीकडे' असतें. म्हणून (त्याचे हेतु पाहिले असतां) त्यानें जरी शंभर वृषभांचा यज्ञ केला तरी त्यायोगें तो अधिकच अधार्मिक, अपवित्र, नास्तिक आणि धर्मचोर बनतो; आणि या कारणांस्तव विलासासक्त मनुष्य हा नास्तिक आणि भ्रष्ट आहे असें समजून त्याच्यापासून दूर राहणेंच जरूर आहे.

४५ शुद्ध आणि पवित्र देहधारी आत्मा वगळला तर या पृथ्वीच्या पाठीवर देवाला राहण्यास योग्य अशी दुसरी जागा नाहीं.

---

# पायथॅगोरस स्मृति

## उपमालंकार.

१ खुशामत ही चित्रांतील चिलखतासारखी आहे; कारण तिच्यापासून आनंद होतो पण उपयोग मात्र कांहींच नसतो.

२ विद्या ही सोन्याच्या किरीटासारखी आहे. कारण विद्येनें प्रतिष्ठा वाढते आणि लाभहि होतो.

३ मोकळीं भांडीं जशीं दांडयांनीं सहज धरतां येतात, तसे लहरी माणसाचे कानहि सहज पिरगाळतां येतात.

४ आयुष्य हें गीतवाद्यांप्रमाणें आरोहावरोहांनीं स्वरमेळ साधलेलें असेल तर तें अधिक सुखावह होतें.

५ निष्णात कुंभाराप्रमाणें बुद्धि ही जीवात्म्याला सुंदर रूप देते.

६ सोन्याप्रमाणें सुज्ञांच्या बुद्धीला महत्तम मूल्य असतें.

७ मुलामा दिलेल्या चिलखताप्रमाणें वटाईचें अंतरंग व बहिरंग हीं एकच असत नाहींत.

८ लेपाची जी शक्ति तीच बुद्धीची; कारण आपण व्यथित झालों तर लेप आपल्यास बरें करतो व आपण चांगले असलों तर बुद्धि आपल्यास सुखविते.

९ दुष्ट कुत्र्याप्रमाणें दुष्ट मनुष्याच्या शब्दापेक्षां त्याच्या मूक वृत्तीलाच जास्त भिऊन असलें पाहिजे.

१० पत्नीचा त्याग करून राख ठेवणें हें जसें अयोग्य तसेंच मित्राला सोडून खुशामत्याला जवळ करणें हेंहि अयोग्यच.

११ मॅगपाय पक्ष्याप्रमाणें वाचाळ माणसें आपल्या सतत वटवटण्यानें संभाषणाचा आनंद नष्ट करतात.

१२ अधार्मिक व दुष्ट, तसेच मूर्ख व तामसी लोक म्हातारे झाले म्हणजे सूड घेणाऱ्या देवता त्यांच्या पापकृत्यांना सोडीत नाहींत.

१३ मेजवानीनंतर लोक जसे सुखानें घरीं परत जातात तसाच इहलोकचा निरोप शहाण्यानें सुखानें घ्यावा.

१४ बंदर हें जसें जहाजाचें तसें मैत्री हें जीविताचें विश्रांतिस्थान आहे.

१५ बापानें केलेली कानउघाडणी हें छान औषध आहे; कारण कडक शिक्षेपेक्षां ती अधिक हितकारक असते.

१६ दैवाशीं झगडा चालला असतां सज्जनानें एखाद्या निष्णात मल्लाप्रमाणें आपला बोजा दैवावर टाकावा.

१७ जवळच्या व सुखकारक अशा रस्त्याप्रमाणें स्वाभिमानाला पुष्कळच शोभा असते आणि श्रम फार थोडे पडतात.

१८ लगामानें खट्याळ घोडा तर विचारानें शीघ्रकोपी मन अंकित होतें.

१९ परीक्षासाधनाचा उपयोग मिठाप्रमाणें फार थोडा करावा.

२० पायास बरोबर बसणारी वहाण व चांगला जम बसलेलें आयुष्य हीं त्रासदायक होत नाहींत.

२१ पायघोळ अंगरखे जसे शरीराला तशी अलोट संपत्ति ही जीवाला खोडा घालते.

२२ शर्यतीच्या रिंगणांत फिरणाऱ्यांना यशाचें पारितोषिक शर्यतीच्या शेवटीं मिळतें; पण ज्ञानतपस्येंत ज्यांना आनंद वाटतो त्यांना तें वृद्धपणीं मिळतें.

२३ मायभूमीच्या दर्शनाची ज्याला उत्कंठा लागली आहे त्यानें गायकांना न भुलतां पुढची वाट चालणें जसें आवश्यक

आहे तसें सद्गुणांची जोड पाहिजे असेल तर सुखाला अंग न देतां पुढें जाणें अवश्य आहे.

२४ वारा अनुकूल असतांना जलपर्यटनास निघणारीं माणसें वादळप्रसंगाचीं साधनें आधींच सिद्ध ठेवतात; त्याचप्रमाणें शहाण्यांनीं विपत्कालीं कामास येतील अशा अवश्य त्या गोष्टींची तरतूद संपत्कालीं करून ठेवावी.

२५ वस्त्रें धुवून पांढरीं शुभ्र केलीं तरी तीं वापरलीं कीं पुनः घाण होतात. पण आत्मा एकदां अज्ञानमल धुवून काढून शुद्ध केला कीं तो चिरंतन तसाच शुद्ध राहतो.

२६ कोणी पाठलाग करीत नसलें तरी पळून जाणाऱ्या गुलामाला भीति वाटतच असते; तसें हातून दुर्वर्तन झालें नसलें तरी मूर्ख लोक व्यग्र होतात.

२७ लोभी मनुष्याची संपत्ति ही अस्त पावलेल्या सूर्याप्रमाणें जागत्या जीवाला आनंद देत नाहीं.

२८ जमीनीचें फळ वर्षांतून एकदां मिळतें; पण मित्राचें फळ हें सर्वकाळ मिळत असतें.

२९ प्रत्येक वाद्याचे सूर लावणें हें गायकाचें काम होय; तसें दैवाच्या प्रत्येक खेळाशीं जमवून घेणें हें सुशिक्षिताचें काम आहे.

३० आजारी मनुष्याचे गुद्दे आणि मूर्खाची धमकी यांपैकीं एकालाहि भिण्याचें कारण नाहीं.

३१ छातीच्या संरक्षणासाठीं अंतर्वस्त्राचा, तसा दुःख-निवारणासाठीं बुद्धीचा उपयोग करणें अवश्य आहे.

३२ आजाऱ्याचें अन्न आणि मूर्खाचा जीव हे सर्वस्वीं चोखंदळ असतात.

३३ शाळेंत न घातलेलीं मुलें जसा अक्षरांचा, तसा अशिक्षित लोक विषयांचा घोटाळा करतात.

३४ तत्त्वज्ञान प्राप्त झालेली बुद्धि ही सारथ्यासारखी आहे. मनुष्याच्या मनीषा तिला कळतात आणि ती त्याला नेहमीं चांगल्या मार्गास नेते.

३५ खरोखर काळ हा कटु वनस्पतीला मधापेक्षां गोड बनवील; पण केव्हां केव्हां परिस्थितीच अशी येते कीं तेव्हां मित्रापेक्षां शत्रूच बरा वाटावा.

३६ निष्णात नावाड्याची नावहि केव्हां केव्हां फुटते; तसा सज्जनालाहि दुर्दैवाचा टोला खावा लागतोच.

३७ मेघगर्जना मुलाला, तशी धमकावणी ही मूर्खाला भिवविते.

३८ अलंकारानें मूर्तीला तर कृतीनें मनुष्याला शोभा येते.

१०५०१

३९ सोन्याच्या पेल्यांतून प्राणघातक औषध पिणें आणि अविवेकी मित्राचा सल्ला स्वीकारणें हीं एकच.

४० पाकोळ्या चांगली हवा दर्शवितात; तसे तत्त्वज्ञानविषयक संवाद दु:खविमोचनाचा मार्ग दाखवितात.

४१ मूर्ख मनुष्याइतकी पोरक्या पोरांनाहि पालकाची आवश्यकता नसते.

४२ दैव हें चढाओढीच्या सामन्यांतील पक्षपाती पंचाप्रमाणें आहे; कारण तें पुष्कळदां कांहींच करून न दाखविणाराला यशाचा मुकुट अर्पण करतें !

४३ यशस्वी जलपर्यटनासाठीं अनुकूल वारा आणि मार्गदर्शक नाविक पाहिजे; तशी सुखकर जीवनासाठीं सारासार विचारशक्ति आणि दैव यांची आवश्यकता आहे.

४४ भित्र्या मनुष्यानें घातलेलें कवच त्यालाच घातक होतें; आणि मूर्ख हा आपल्या संपत्तीचा उपयोग तसाच करतो.

४५ निर्बल नांगर टाकून जहाज एका जागीं स्थिर करणें व नीतिभ्रष्ट मनुष्यावर विश्वास टाकणें हीं दोन्ही एकच.

४६ ढग हे सूर्याला तर मनोविकार हे बुद्धीला पुष्कळदां झाकून टाकतात.

४७ सोन्याचा पलंग रोग्याला तशी गडगंज संपत्ति मूर्खाला सुखद होत नाहीं.

४८ गार पाण्यानें दाह तसा शांत भाषणानें क्रोध नष्ट होतो.

४९ आंवट दारू ही यथेच्छ पानाला तशी खेडवळ वागणूक ही संभाषणाला योग्य नसते.

५० माकडाचा राग आणि स्तुतिपाठकाची धमकी यांची किंमत सारखीच असते.

५१ बालपण हा आयुष्याचा पहिला अंक आहे. म्हणूनच नाटकाच्या पहिल्या अंकाप्रमाणें सारीं माणसें बालपणाकडे चांगलें लक्ष पुरवितात.

५२ लेखनांत सावधपणा तसा कार्यांत चांगुलपणा ठेवणें अवश्य आहे.

५३ जसा वृक्षाच्या ठिकाणीं तसा तारुण्यांतहि पहिला मोहोर हा सद्गुणांचें फल दर्शवितो.

५४ मेजवानीच्या प्रसंगीं दारूनें उन्मत्त न होणारा तसा संपत्कालीं अन्यायानें न वागणारा मनुष्य विशेष चांगला.

५५ सर्पाला दूध पाजणें आणि नीतिभ्रष्टाला उपदेश करणें हें एकच; कारण कृतज्ञता ही दोघांतहि नसते.

५६ अनुकूल हवेंत गलबत क्वचितच फुटतें; तसें मार्गदर्शकाच्या अभावीं तें फुटत नाहीं हेंहि क्वचितच.

५७ वाऱ्यानें भाते फुगतात तसे खोट्या ग्रहांनीं मूर्ख लोक अहंमन्य बनतात.

५८ शीण न होईल इकडे व्यायाम करणारानें, तसें मत्सर उत्पन्न न होईल इकडे धनिकानें लक्ष देणें अवश्य आहे.

५९ एक सुज्ञ मनुष्य म्हणतो कीं नेमस्तपणा फार चांगला. आम्हीहि त्याच मताचे आहों; आम्ही आणखी पुढें म्हणतों कीं जिवलग आणि धर्मशील मित्रा, आयुरारोग्यासाठीं याहून अधिक कांहीं करण्याचें कारण नाहीं.

# पायथॅगोरस स्मृति

## नीतिबोध

१ जें अयोग्य आहे तें करण्याचा विचार देखिल मनांत आणूं नका.

२ शारीरिक शक्तीपेक्षां आत्मिक शक्ति मिळविणेंच पसंत करा.

३ सुखाच्या गोष्टींपेक्षां कष्टाच्या गोष्टीच जास्त सद्गुणपोषक असतात अशी खूणगांठ मनाशीं बांधा.

४ जीवाचा प्रत्येक विकार हा त्याच्या मुक्तिमार्गावराल मोठा शत्रु होय.

५ आयुष्याचे अनक मार्ग एकाच वेळीं आक्रमण करणें दुर्घट आहे.

६ पायथॅगोरसचें एक वचन आहे: सर्वोत्कृष्ठ जीवन-

पथाची निवड करणेंच अगत्याचें आहे; कारण संवयीनें तोच मार्ग सुखाचा वाटूं लागेल. संपत्ति म्हणजे जीवितनौकेवरील निर्बल नांगर; कीर्ति तर जास्तच दुर्बल; आणि शरीर, सत्ता व मानसन्मान हीं तशींच. तर मग सबल नांगर कोणते? दूर-दर्शित्व, मनाचा थोरपणा आणि धैर्य हे ते होत. कसल्याहि तुफान वादळांत ते कंपित होत नाहींत. ईश्वराचा असा निर्बंधच आहे कीं, सद्गुणच काय ते खरे बलवान. बाकीच्या सर्व गोष्टी कवडी किंमतीच्या.

७ पुतळ्याचे सर्व अवयव जसे सुंदर असावे लागतात तसे मानवी जीविताचे सारे खंड सुंदरच पाहिजेत.

८ देवांना धूप घालणें व सज्जनांची स्तुति करणें योग्य आहे.

९ अन्यायानें वागल्याचा वृथा आरोप ज्यांच्यावर आला आहे त्यांची बाजू घेतलीच पाहिजे. पण जे कोणी गुणानें श्रेष्ठ असतील त्यांची स्तुति करणें आवश्यक आहे.

१० भरपूर दागिने घातले आहेत म्हणून नव्हे, तर स्वभावच उमदा आहे म्हणून घोड्याला उमदा म्हणावयाचें, तसेंच संपत्ति आहे म्हणून नव्हे, तर उदार महात्मा असेल त्यालाच गुणी म्हटलें पाहिजे.

११ जेव्हां ज्ञानी मनुष्य आपलें तोंड उघडतो तेव्हां देवालयांतील मूर्तीप्रमाणें त्याचें अंतर्गत सौंदर्यच दृष्टीला अनेक रीतींनीं प्रतीत होतें.

१२ ज्ञान हेंच परम कल्याण आहे असें सारे लोक ठासून सांगतात. पण हें परम कल्याण साधण्यासाठीं जीवापाड उद्योग करणारे मात्र फार विरळा हें लक्षांत ठेवा.

१३ विचारी व्हा आणि श्रद्धाप्रवृत्त राहा; कारण याच गोष्टी ज्ञानाचा आधार आहेत.

१४ सोन्याच्या पलंगावर तळमळत पडण्यापेक्षां देवावर आणि स्वतःवर भरंवसा ठेवून गवतावर पडून राहाणें जास्त चांगलें.

१५ ज्या गोष्टी देणें किंवा काढून घेणें दैवाधीन आहे, त्या गोष्टींची गरज तुम्हांस लागूं नये.

१६ देहत्यागानंतर ज्या गोष्टींची तुम्हांला गरज लागणार नाहीं त्या सर्व गोष्टी तुम्ही तुच्छ माना. देवांनीं आपले साहाय्यकारी व्हावें म्हणून त्यांची करुणा भाका.

१७ वस्त्रांत निखारा छपवून ठेवणें अथवा नीतिदृष्ट्या वाकडें पडलेलें पाऊल काळाच्या उदरांत गडप करणें शक्य नाहीं.

१८ वारा हा अग्नीला चेतवितो; चालरींत पाळली म्हणजे प्रेम वाढीस लागतें.

१९ अन्यायाची ज्यांना चीड आहे तेच देवांना प्रिय होतात.

२० देहाला आवश्यक अशा गोष्टी त्रासाशिवाय आणि कष्टाशिवाय लोकांना सहज मिळूं शकतात. पण ज्यांची प्राप्ति कष्ट आणि त्रास यांच्याशिवाय होत नाहीं अशा वस्तू भ्रष्ट विचाराच्या तृप्तीसाठीं असतात, देहाच्या तृप्तीसाठीं नव्हे.

२१ वासनेविषयीं पायथॅगोरसनें म्हटलें आहे: वासना हा मनोविकार अनेकविध, अनेकरूप आणिं अत्यंत कष्टदायक असा आहे. तथापि कांहीं वासना जोडलेल्या व आगंतुक असतात तर दुसऱ्या कांहीं स्वाभाविक असतात. पण वासना ही आत्म्याची एक विशिष्ट प्रवृत्ति व उकळी आहे; किंवा समृद्धीची भूक वा संवेदनेचें रूप आहे. अयोग्य, अपरिमित व अप्रासंगिक अशा दुष्ट आणि प्रमादशील वासनेच्या तीन ज्ञात जाती आहेत. कारण वासना ही त्या त्या वेळेपुरती अयोग्य, त्रासदायक व अनुदार होते किंवा ती सर्वस्वीं तशी असत नाहीं, पण वाजवीपेक्षां जास्त तीव्र आणि टिकावू असते. अथवा तिसरें असें कीं योग्य प्रसंग नसतांनाहि तिचा जोर होतो आणि अशा वस्तूच्या ठायीं कीं जेथें तिची मुळीं प्रवृत्तीच होऊं नये.

२२ शब्दांनीं आपले प्रमाद झांकण्याचा प्रयत्न करूं नका, तर वाग्दंडानें त्यांचें परिमार्जन करण्यास झटा.

२३ जो प्रमाद करतो त्याची कानउघाडणी करणें जितकें कठिण आहे तितकें प्रमाद करणें कठिण नाहीं.

२४ देहाचा रोग झाकल्यानें किंवा त्याचें वर्णन केल्यानें तो बरा होत नाहीं. तसेंच नीट संरक्षण व जपणूक नाहीं अशा व्याधिग्रस्त आत्म्यावर कांहीं उपाय करतां येत नाहीं.

२५ योग्य प्रसंगींच्या सौंदर्याप्रमाणें भाषणस्वातंत्र्याचा अलंकार हा विशेष आनंदाची जननी आहे.

२६ बिनधारेची तरवार बाळगणें किंवा भाषणस्वातंत्र्याचा उपयोग करतां न येणें हें योग्य नव्हे.

२७ जगांतून सूर्य काढून घेतां येत नाहीं, तसेंच विद्वत्ते-पासून भाषणस्वातंत्र्य हरण करतां येत नाहीं.

२८ मलीन वस्त्रें परिधान करणाराचें शरीरसौष्ठव चांगलें असणें शक्य आहे, तसेंच जो दरिद्री आहे त्यालाहि भाषण-स्वातंत्र्याचा लाभ मिळावयाला हरकत नाहीं.

२९ जे खुशामत करणारे आहेत त्यांच्यापेक्षां जे कान-उघाडणी करणारे असतील त्यांची आवड धरणें चांगलें; पण

खुशामत करणारांना शत्रूपेक्षांहि भयंकर समजून त्यांच्यापासून दूर राहा.

३० लोभी मनुष्याचें जीवन आणि चौदाव्या दिवसाचें भोजन यांत साम्य आहे. कारण अशा भोजनांत मेजवानीला शोभणारे सारे पदार्थ असतात, पण त्यांचा आनंद मात्र कोणाला होत नाहीं.

३१ मोठ्यांत मोठें बल आणि संपत्ति म्हणजे संयम. म्हणून तो संपादन करा.

३२ एका माणसाचा दुसऱ्या माणसाशीं वारंवार संपर्क नसावा असा पायथॅगोरसचा एक उपदेश आहे. त्याचा गूढार्थ असा दिसतो कीं वरचेवर संभोगप्रवृत्त होणें योग्य नव्हे.

३३ जो वासनांचा गुलाम आहे त्याला मोक्ष मिळणें शक्य नाहीं.

३४ पायथॅगोरस म्हणतो, निशा म्हणजे उन्मादाचें चिंतन होय.

३५ मद्यप्याची मद्यासक्ति कशी नाहींशी करावी असा प्रश्न केला असतां पायथॅगोरसनें उत्तर दिलें कीं त्यानें स्वतः निशेमध्यें काय काय प्रकार केले याचें वारंवार निरीक्षण करावें.

३६ पायथॅगोरस म्हणतोः मौन तरी धरावें किंवा कांहीं सरस असें बोलावें.

३७ रिकामी तोंडाची वाफ दवडण्यापेक्षां उगीच दगड फेकीत बसणें हेंच तुम्हांला उचित होय.

३८ भाराभर शब्दांनीं थोडें सांगू नका, तर थोड्या शब्दांनीं पुष्कळ सांगाः

३९ चलाख बुद्धि ही मनुष्याला तारक अथवा मारक होते.

४० राष्ट्रानें एखाद्या मनुष्यावर अन्याय केला असतां त्या मनुष्यानें राष्ट्राशीं कशी वागणूक ठेवावी असा प्रश्न केला असतां पायथॅगोरसनें उत्तर दिलें: आईशीं जशी ठेवाल तशी.

४१ काटकसर आणि स्वावलंबन मनुष्य प्रवासानें शिकतो. खाण्यास भाकर व निजायला गवत यांनीं भुकेचा आणि श्रमाचा गोड परिहार होतो.

४२ शहाण्याला कोणताहि देश राहण्यास योग्य असतो; कारण सारें जग हा गुणी माणसाचा देशच आहे.

४३ पायथॅगोरस म्हणे कीं, नगरांत प्रथम विलास शिरतो, नंतर भोगातिरेक, नंतर कामुक मद व शेवटीं नाश.

४४ पायथॅगोरस म्हणेः उत्तम नगर तेंच कीं जेथें अत्यंत गुणी लोकांची वसति असते.

४५ तुमच्या मतें ज्या गोष्टी चांगल्या आहेत त्या करा; मग त्या करण्यानें तुमचें नांव झालें नाहीं तरी चिंता नाहीं. कारण तेलीतांबोळी हे चांगल्या गोष्टींचे कुपरीक्षक होत. म्हणून ज्यांच्या स्तुतीकडे तुम्ही ढुंकूनहि पाहणार नाहीं त्यांच्या वाक्ताडनाकडेहि दुर्लक्षच करा.

४६ जे दुष्टांना शिक्षा करीत नाहींत त्यांची अशी इच्छा असते कीं सुष्टांना अपाय व्हावा.

४७ लगामाशिवाय घोडा अथवा काटकसरीशिवाय संपत्ति अंकित राहणें शक्य नाहीं.

४८ निसरड्या रस्त्यावरील शर्यतींत भाग घेणें व संपत्कालीं आपल्या मोठेपणाचा अहंकार धरणें हीं दोन्हीहि एकच.

४९ संपत्तीचें कुठलेंहि द्वार इतकें बंद केलेलें असत नाहीं कीं तें भाग्यकालीं उघडणार नाहीं.

५० रिकाम्या जीवाला जें अनिवार्य दुःख होतें त्याची विचारपूर्वक हकालपट्टी करा.

५१ समबुद्धीनें दारिद्र्य सहन करणें हें स्थितप्रज्ञाचें काम होय.

५२ आपल्या आयुष्याचा जपून उपयोग करा, नाहीं तर

चिंता व दुःख यांतच तुम्ही त्याचा शेवट कराल.

५३ प्लेटो व पायथॅगोरस यांना दिसून आलें कीं, विद्यमान जीवितांतून सुटून जाण्याचा मार्ग या दृष्टीनें वार्धक्याचा विचार करावयाचा नाहीं, तर वार्धक्य म्हणजे भाग्यशाली जीवनाचा प्रारंभच होय ही दृष्टि विचारांत घ्यावयाची.

५४ प्राचीन ब्रह्मज्ञानी तसेच पुरोहित प्रतिज्ञापूर्वक सांगतात कीं, कांहीं शिक्षा म्हणूनच आत्म्याचा शरीराशीं संयोग होतो, आणि मृत शरीर समाधीखालीं पुरतात त्याप्रमाणें आत्मा या देहांत पुरला आहे.

५५ जागृत स्थितींत आम्ही जें जें पाहतों तें तें मरण, आणि सुषुप्तींत पाहतों तें स्वप्न होय.

# पायथॅगोरस स्मृति

## नवनीत

१ गोष्ट फार क्षुल्लक म्हणून तिची उपेक्षा करणें ही मानवी आयुष्यांतील क्षुल्लक गोष्ट नव्हे.

२ ज्ञानी आणि द्रव्येषणा नसणारा हे ईश्वरासमान होत.

३ ईश्वराच्या नांवाचा शोध घ्यावयाला जाऊं नका, तुम्हांला तें सांपडणार नाहीं. ज्याला म्हणून नांव आहे त्याच्याहून त्याचें नामाभिधान करणारा अधिक श्रेष्ठ असतो. नांव देणारा एक व तें ऐकणारा दुसरा असतो. मग ईश्वराला नांव देणारा कोण? ईश्वर हेंहि ईश्वराचें नांव नसून आमची त्याच्यासंबंधीं जी कल्पना आहे तिचें तें निदर्शक चिन्ह आहे.

४ ईश्वर हा प्रकाश असून तद्विरुद्ध जो अंधार त्याचा ईश्वराला संपर्क होऊं शकत नाहीं.

५ ईश्वरासम असें कांहीं तरी तुमच्यांत आहे आणि म्हणून तुमच्यांत जें ईश्वरासम आहे त्याच्यासाठीं स्वतःचा देवालयासारखा उपयोग करा.

६ ईश्वर आपला शासक असावा म्हणून सर्वांआधीं त्याची पूजा करा.

७ तुम्ही वाटेल त्याचा सर्वांपेक्षां जास्त मान करा; मात्र ज्याचा तुम्ही तसा मान कराल त्याचेंच स्वामित्व तुमच्यावर राहील. पण स्वत:वरील स्वामित्व जर तुम्ही ईश्वराकडे द्याल तर मात्र त्यायोगें तुमचें स्वामित्व सर्वांवर राहील.

८ ईश्वराचा सर्वांत मोठा मान करणें म्हणजे त्याला ओळखणें आणि त्याला अनुसरणें होय.

९ खरोखर अशी एकहि वस्तु नाहीं कीं, जिचें ईश्वराशीं पूर्ण साम्य आहे. तथापि हीनप्रकृति जीवानें शक्य तों त्याचें अनुसरण करणें म्हणजेच त्याच्याशीं कृतज्ञ राहणें होय.

१० ईश्वराला वास्तविक कशाचीच आवश्यकता नाहीं. पण सुज्ञाला मात्र ईश्वर पाहिजे असतो. म्हणून ज्याला फारच थोड्या आणि अगदीं आवश्यक तेवढ्याच गोष्टींची गरज असते तोच ईश्वरतुल्य होण्याचा प्रयत्न करतो.

११ ईश्वराच्या दृष्टीनें मोठें होण्याचा प्रयत्न करा, पण लोकांत कोणाचा मत्सर मात्र करूं नका.

१२ जीवंत असतांना ज्या सुज्ञाची प्रतिष्ठा लोकांत फार थोडी असते तो मृत्यूनन्तर प्रख्यात होतो.

१३ जेवढा काल तुम्ही ईश्वराचा विचार करणार नाहीं, तेवढा काल तुम्हीं व्यर्थ दवडला असें समजा.

१४ सद्बुद्धि हें दैवी बल होय.

१५ दुर्बुद्धि हें आसुरी बल होय.

१६ जें न्याय्य आहे तें न्याय्य आहे म्हणूनच गौरवा.

१७ जेव्हां तुम्ही अन्यायानें वागाल किंवा तसें वागण्याचा विचार मनांत आणाल, तेव्हां तुम्ही ईश्वरापासून कांहीं लपले जाणार नाहीं.

१८ संयम हा दयेचा पाया, तर ईश्वरभक्ति हें दयेचें शिखर आहे.

१९ जें सुखद आहे तें नव्हे, तर जें योग्य आहे तेंच प्राप्त व्हावें अशी इच्छा धरा.

२० शेजाऱ्यानें आपल्याशीं जसें वागावें अशी तुम्हांस इच्छा असेल तसें तुम्ही शेजाऱ्याशीं वागा.

२१ जें ईश्वरास कळूं नये असें तुम्हांस वाटतें तें करूं नका अथवा तें करण्याचा विचारहि मनांत आणूं नका.

२२ ईश्वराचें देणें कोणासहि हरण करतां येत नाहीं.

२३ कोणतेंहि कर्म करण्यापूर्वी ईश्वराचें चिंतन करा; हेतु हा कीं त्याचा प्रकाश तुमच्या उत्साहाला मार्गदर्शक व्हावा.

२४ ईश्वरस्मरणानें जीव प्रकाशित होतो.

२५ अन्न म्हणून सर्व प्राणिमात्रांचा उपयोग करणें यांत कांहीं विशेष नाहीं; पण तन्निवृत्त होणें हें अधिक समंजसपणाचें आहे.

२६ ईश्वर हा पापाचा कर्ता नाहीं.

२७ शरीर धारण करण्यास आवश्यक असेल त्यापेक्षां अधिकाचा संग्रह तुम्ही करूं नका.

२८ ज्याचें हरण कोणालाहि करतां येणार नाहीं अशाचा संग्रह करा.

२९ ज्याच्यावाचून तरणोपाय नाहीं तें त्याला तरणोपाय नाहीं म्हणूनच सहन करा.

३० अशाच गोष्टी ईश्वरापाशीं मागा कीं ज्या देणें त्याच्या योग्यतेला शोभेल.

३१ अशाच गोष्टी ईश्वरापाशीं मागा कीं ज्या तुम्हांला मानवांकडून मिळणें अशक्य आहे.

३२ असें मागणें देवाजवळ मागूं नका कीं जें मिळालें असतां चिरकाल टिकणार नाहीं.

३३ तुमची सारासारविचारबुद्धि ही तुमच्या जीविताचा प्रदीप आहे.

३४ ज्या गोष्टींना आधीं श्रमाची आवश्यकता आहे त्या श्रमोत्तरच आपल्याला मिळाव्या अशी इच्छा ठेवा.

३५ जनरंजन कसें होईल याची चिंता करूं नका.

३६ शरीर पंचत्व पावल्यावर ज्या गोष्टींची आम्हांला उणीव भासेल त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणें योग्य नव्हे.

३७ ईश्वराच्या सर्व प्रकारच्या मोठेपणाची जीवाला कल्पना आली म्हणजे मग जें आत्मतः महनीय आहे तें आकलन करण्याची संवय त्याला लावा.

३८ तुमच्यापासून जें दुष्ट मनुष्य लुबाडण्याचा संभव आहे, तें मोलाचें आहे असें समजूं नका.

३९ ईश्वराच्या दृष्टीनें ज्या गोष्टी बहुमोल आहेत त्याच तेवढ्या बहुमोल असें जो समजतो तोच ईश्वराला प्रिय असतो.

४० आवश्यकतेपेक्षां अधिक असणारी प्रत्येक वस्तु म्हणजे मनुष्याचा शत्रूच होय-

४१ अयोग्य गोष्टीची आवड असणाराला जें योग्य आहे त्याची आवड असणार नाहीं.

४२ ज्ञानी मनुष्याची बुद्धि ही सर्वकाल ईश्वरनिष्ठ असेत.

४३ ईश्वर हा ज्ञानी मनुष्याच्या ठिकाणीं वास करतो.

४४ कामना ही कधींहि तृप्त होणारी नसते, आणि

म्हणून ती नेहमीं बुभुक्षितच असते.

४५ ज्ञानी हा नेहमीं आत्मतुल्य असतो.

४६ ईश्वराचें ज्ञान आणि त्याचें अनुकरण हीं मोक्षप्राप्तीस पुरेशीं आहेत.

४७ असत्याचा उपयोग विषाप्रमाणें माना.

४८ ज्ञानाचें खास लक्षण सत्य हेंच होय.

४९ जेव्हां तुम्ही लोकांचे शासक होता तेव्हां लक्षांत ठेवा कीं तुमचाहि शास्ता ईश्वर आहे.

५० देवसदृश आचार ठेवणें हाच जीविताचा अंतिम हेतु आहे अशी मनाची वृत्ति ठेवा.

५१ नीतिभ्रष्ट प्रेम हें दुःखाचें मूळ आहे.

५२ दुष्ट मनोवृत्ति म्हणजे आत्म्याचा रोग; पण अनीति व अश्रद्धा म्हणजे त्याचें मरण होय.

५३ सर्व लोकांना अशा रीतीनें वागवा कीं, जणु कांहीं देवाच्या खालोखाल तुम्हीच सर्वांवर देखरेख ठेवणारे आहां.

५४ जो मानवाला वाईट रीतीनें वागवितो तो स्वतःलाच तसें वागवितो.

५५ शत्रूचेंहि कल्याण करण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें अशी इच्छा धरा.

६१३४ ५१

५६ ईश्वरसदृश आचार राहावा म्हणून सर्व कांहीं सहन करा.

५७ ज्ञान्याचा सन्मान केल्यानें स्वतःचाच सन्मान होतो.

५८ सर्व कार्यांत ईश्वर तुमच्या सन्मुख असूं द्या.

५९ ईश्वरसन्निध सतत राहतां यावें म्हणून पितृपद नाकारण्याची तुम्हांला मोकळीक आहे. तथापि युद्धविशारदाप्रमाणें लढा देण्यास तुम्ही सिद्ध असाल तर विवाहित व्हा आणि प्रजोत्पादन करा.

६० जीवंत राहणें स्वाधीन नाहीं; पण नीतीनें राहणें मात्र स्वाधीन आहे.

६१ जो ज्ञानाचा अभ्यासक आहे त्याच्यावरील दोषारोप मान्य करण्यास राजी होऊं नका.

६२ आनंदी वृत्तीनें राहण्याची जर तुम्हांला इच्छा असेल तर अनेक गोष्टी करण्याचें मनांत आणूं नका. कारण कार्यवैपुल्यानें तुम्हांला गौणत्व येईल.

६३ तृषाहारक असा प्रत्येक पेला तुम्हांला गोड वाटावा.

६४ वेडेपणापासून जसे तुम्ही लांब पळाल तसे मद्यापासूनहि दूर राहा.

६५ देहापासून चांगलें असें कांहींच निर्माण होत नाहीं.

६६ इंद्रियवासनेच्या विषयाचा लाभ झाला कीं समजा, कीं तुम्हांला जबर शिक्षाच मिळाली. कारण अशा विषयाच्या प्राप्तीनें तृष्णा कधींहि शांत होत नाहीं.

६७ जें जें तुम्ही कराल त्याला ईश्वरानें साक्षी असावें अशी प्रार्थना करा.

६८ ईश्वर आहे असें दुष्ट मनुष्याला वाटत नाहीं

६९ ज्ञानी मनुष्य हा ईश्वराचा भागीदार होतो.

७० तुमच्यांतील ज्ञान जेथें वास्तव्य करतें तेथेंच तुमचें कल्याणहि पण राहतें.

७१ जें आत्म्याला घातक नाहीं तें मनुष्यालाहि घातक नाहीं.

७२ जो अन्यायानें शाहण्याला सभेंतून घालवून देतो तो आपल्या अनीतिद्वारां त्याच्यावर उपकारच करतो. कारण त्यामुळें त्या शहाण्या मनुष्याची जणुं एका बंधनांतूनच सुटका होते.

७३ आत्म्यासंबंधीं ज्ञान नसल्यामुळें मरणाचें भय मनुष्याला दुःखद होतें.

७४ जोंवर आपल्याला ज्ञान आहे असें तुम्हांस वाटतें, तोंवर तुम्हांला तें मिळणार नाहीं.

७५ आपलें शरीर हें आत्म्याचें वस्त्र आहे असें समजा आणि म्हणून तें शुद्ध राखा.

७६ प्रत्येकाजवळ अध्यात्म विषय काढूं नका.

७७ ईश्वराविषयीं बोलणें हें धोक्याचें आहे, आणि तो धोका कांहीं लहान नव्हे. मग तें बोलणें सत्य कां असेना.

७८ ईश्वरविषयक सत्य विधान हें ईश्वराचेंच विधान होय.

७९ समाजापुढें ईश्वराविषयीं बोलण्याचें धाष्टर्य करूं नका.

८० जो ईश्वराची पूजा करीत नाहीं त्याला त्याचें ज्ञान असत नाहीं.

८१ ईश्वराला शोभणारा मनुष्य मनुष्यांमधील देवच होय.

८२ जवळ पुष्कळ असून कोणाला कांहीं द्यावयाचें नाहीं त्यापेक्षां कांहीं जवळ नसणें हेंच चांगलें.

८३ ईश्वर आहे पण तो कोणाची काळजी घेत नाहीं असें ज्याला वाटतें त्याच्यांत आणि ईश्वर नाहीं असें ज्याला वाटतें त्याच्यांत काडीचा फरक नाहीं.

८४ जो आपली बुद्धि शक्य तों ईश्वरानुवर्ती ठेवतो त्याच्याच हातून ईश्वराची पूजा उत्तम प्रकारें होते.

८५ जर तुम्ही कोणासहि दुखवीत नसाल तर तुम्ही कोणास भिणारहि नाहीं.

८६ ज्याची दृष्टि खालीं भूमीकडे आहे तो ज्ञानी नव्हे.

८७ खोटें बोलणें म्हणजे संसारांत फसणें व फसविणें होय.

८८ ईश्वर कोण आहे आणि त्याला जाणणारा तुमच्या अंतर्यामी कोण आहे हें ओळखा.

८९ आत्मनाश दुराचारानें होतो, मरणानें नाहीं.

९० तुम्हांला तुमच्या निर्मात्याचें ज्ञान असेल तर तुम्हांला आत्मज्ञानहि होईल.

९१ मनुष्य हा मर्यादेनें, सुज्ञतेनें आणि नीतीनें न वागेल तर ईश्वरसदृश आचार ठेवणें त्याला शक्य होणार नाहीं.

९२ दिव्य ज्ञान हेंच खरें शास्त्र आहे.

९३ दुरात्म्याजवळ तुम्ही ईश्वराची भाषा काढण्याचें धाष्टर्य करूं नये.

९४ ज्ञानी हा ईश्वराचें अनुसरण करतो, तर ईश्वर हा ज्ञानी मनुष्याच्या आत्म्याला अनुसरतो.

९५ राजा हा आपल्या शासितांतच आनंद मानतो, आणि तसाच ईश्वर हा ज्ञानी मनुष्यांतच रमतो. याप्रमाणें शास्ता व शासित हे एकमेकांशीं संलग्न असतात. आणि म्हणून ईश्वर हा ज्ञानी मनुष्याच्या आत्म्याशीं संलग्न असतो व तोच त्याचा रक्षक आणि शास्ता होतो.

१०५०१

९६ ज्ञानी मनुष्याचा शास्ता ईश्वर असतो यास्तव तो धन्य होय.

९७ ईश्वरविषयक शास्त्रीय ज्ञान मनुष्याला मूक बनवितें.

९८ ईश्वरासंबंधीं बोलतांना पुष्कळ शब्द उपयोगिल्यानें ईश्वरासंबंधीं अज्ञान उत्पन्न होतें.

९९ ज्याला ईश्वरज्ञान झालें आहे त्याला जबर महत्त्वाकांक्षा असणार नाहीं.

१०० विद्यावंत, शुचिष्मंत व आत्मज्ञानी मनुष्य हा ईश्वराच्या सत्यत्वाचा प्रेषित होय.

१०१ नेहमीं ईश्वरावर दृष्टि ठेवण्याची संवय लावून घ्या.

१०२ ज्ञाननिष्ठ बुद्धि म्हणजे ईश्वराचा आरसा होय.

१०३ सोनें गंज चढून अथवा नीति नीचपणानें खराब होईल असा विचार मनांत आणूं नका.

१०४ जसा एकाद्या पवित्र देवालयाचा आश्रय करावा तसा आपण स्वतः सद्गुणांचा आश्रय करावा; याचा हेतु हा कीं संसारांतील एकतानता व अखंडता यांसंबंधीं आपण जीवाच्या कसल्याहि अधम उन्मादाला बळी पडूं नये.

१०५ सद्गुणांवर आपला विश्वास साध्वी स्त्रीवरील विश्वासाप्रमाणें असावा; पण संपत्तीवरील भरंवसा हा अस्थिर अशा वेश्येवरील भरंवशाप्रमाणें असावा.

१०६ जुलुमाच्या सांगातीं संपत्ति स्वीकारण्यापेक्षां दरिद्रतेच्या सांगातीं सद्गुण स्वीकारणें चांगलें; आणि व्याधीनें युक्त अशा खादाडपणापेक्षां आरोग्यानें युक्त असा मितपणा चांगला.

१०७ आहाराची विपुलता ही शरीराला घातक असते. पण जीवात्मा सत्प्रवृत्त असतो तेव्हां शरीररक्षण आपोआपच होतें.

१०८ वेड्याच्या हातीं तलवार देणें व नीतिभ्रष्टाच्या हातीं सत्ता देणें हीं दोन्ही सारखींच भयावह आहेत.

१०९ शरिराच्या ज्या भागांत पू झाला आहे तो भाग आहे त्या स्थितींत ठेवण्यापेक्षां तो कापून टाकणें जसें चांगलें तसेंच जगण्यापेक्षां भ्रष्ट मनुष्यानें मरणेंच उत्तम.

११० तत्वज्ञानाच्या सिद्धांताचा आनंद शक्य तितका लुटावयाचा असतो; जणुं कांहीं तें अमृतच आहे. कारण तज्जन्य सुख हें सत्य, शुद्ध आणि दिव्य आहे. तसेंच मनाचा गाढ विकास करण्यासहि ते सिद्धांत समर्थ असतात. आणि यद्यपि आपणांला ते सनातनत्व देऊं शकत नाहींत, तरी सनातन वस्तूंचें शास्त्रीय ज्ञान संपादन करण्याच्या कामीं ते आपणांला सामर्थ्य देतात.

१११ भावनेचें बल संपादन करणें आवश्यक आहे असें जर आपणांस वाटत असेल तर दूरदर्शित्व संपादन करण्याचा

प्रयत्न आपल्या हातून विशेष आस्थापूर्वक झाला पाहिजे; कारण आमच्यामध्यें जी व्यवहारबुद्धि आहे तिचें दूरदर्शित्व हें चेतनात्मक बलच आहे. पहिल्या बलामुळें आपण नाजूक विषयांत फसलों जात नाहीं तर दुसऱ्या बलाच्या जोरावर आपल्यास व्यावहारिक गोष्टींत खोटी कारणपरंपरा टाळतां येते.

११२ सर्व दुर्गुण हे कलंकच आहेत असें समजून त्यांच्या-पासून आपण आपली बुद्धि जर शुद्ध राखली तर आमच्या हातून देवाचा मान योग्य रीतीनें ठेवला जाईल.

११३ देवालय हें जसें उपायनांनीं तसा आत्मा हा यम-नियमांनीं भूषित करावा.

११४ लहान प्रमेयें हीं मोठ्या प्रमेयांच्या आधीं सोडवावयाचीं असतात, तसे यमनियम हे ज्ञानाच्या आधीं आचरले पाहिजेत.

११५ भूमीचीं पिकें हीं वर्षांतून एकदांच मिळतात; पण ज्ञानाचीं मात्र क्षणोक्षणीं मिळत असतात.

११६ ज्याला जमीनीपासून उत्कृष्ट पीक काढावयाचें आहे त्यानें त्या जमीनीकडे विशेष लक्ष द्यावयास पाहिजे. तसेंच सारें चित्त आत्म्याकडेच द्यावें म्हणजे तदनुरूप योग्य फल प्राप्त होईल.

# पायथॅगोरस स्मृति

## लाक्षणिक बोल

१ पूजेसाठीं देवालयाकडे जातांना अथवा देवालयांत असतांना संसारविषयक गोष्टी बोलूं किंवा करूं नका.

२ देवालयांत उपेक्षाबुद्धीनें प्रवेश करूं नका किंवा पूजनहि निष्काळजीपणानें करूं नका. अगदीं दाराशीं उभे असलात तरी तसें करूं नका.

३ बलिदान आणि पूजाविधि अनवाणींच करा.

४ देवाविषयीं आणि दैवी सांप्रदायाच्या चमत्कारांविषयीं साशंकता ठेऊं नका.

५ चाकोरी सोडून बिन रुळलेल्या वाटेनें जा.

६ आधिभौतिक गोष्टींपासून दूर राहा. कारण त्या पार्थिव देवांच्या सत्तेखालच्या आहेत.

७ सर्वांआधीं वाणीचें नियमन करून तिला देवमार्गानुवर्ती करा.

८ तलवारीनें विस्तव कापूं नका.

९ शिरक्याच्या बाटलीपासून दूर राहा.

१० ओझें उचलूं लागण्यास एकाद्यास साहाय्य करा; पण तें खालीं ठेवण्यासाठीं त्यास साहाय्य करूं नका.

११ पादत्राण घालण्यासाठीं पाय पुढें करतांना प्रथम उजवा पाय पुढें करा.

१२ बुद्धिबल संपादन केल्यावाचून पायथॅगोरसच्या विषयाची चर्चा करूं नका.

१३ तराजूच्या दांडीच्या पलीकडे पाऊल टाकूं नका.

१४ एकदां घरांतून निघाल्यानन्तर पुनः परत फिरूं नका; कारण जीवन्त पिशाच्चें तुमची पाठ धरतील.

१५ सूर्याकडे दृष्टि लावून मूत्रविसर्जन करूं नका.

१६ कोंबडा पोसा; पण त्याचें बलिदान करूं नका. कारण तो सूर्यचंद्रांना पवित्र आहे.

१७ जो वक्रनखी आहे त्याला पोसूं नका.

१८ मार्गाला फाटे फोडूं नका.

१९ घरांत पाकोळीला थारा देऊं नका.

२० आंगठी घालूं नका.

२१ आंगठीवर देवाची मूर्ति कोरूं नका.

२२ दिव्याच्या साहाय्यानें आरशांत पाहूं नका.

२३ अति हसण्याच्या व्यसनांत पडूं नका.

२४ यज्ञाच्या वेळीं नखें काढूं नका.

२५ आपला उजवा हात कोणालाहि सहज देऊं नका.

२६ गादीवरून उठतांना निजल्यामुळें चादरीवर पडलेल्या सुरकुत्या नाहींशा करून मग गादीची वळकटी करा.

२७ काळीज खाऊं नका.

२८ मेंदू खाऊं नका.

२९ एरीथीनसचा स्वीकार करूं नका.

३० घेवडा वर्ज्य करा.

३१ मांस वर्ज करा.

# पायथॅगोरस स्मृति

## स्पष्टीकरण–सुवर्णसूक्त

पायथॅगोरसनें मानवी सद्गुणांचा एक आणि दैवी सद्-गुणांचा एक असे दोन भाग कल्पिले आहेत. त्याला अनु-सरून या सुवर्ण सूक्तांचे १ ते ४७ पहिला, आणि ४८ ते ७१ दुसरा असे दोन खंड पाडतां येतात. पैकीं पहिल्या खंडांत मानवी किंवा व्यावहारिक सद्गुणांचें विवरण केलें असून त्याचा हेतु सदाचारसंपत्ति मिळविणें हा आहे. ‘आचारः प्रथमो धर्मः’ या आमच्या स्मृतिवचनाला धरूनच हें विवेचन आहे. ४८ ते ७१ या सूक्तांच्या दुसऱ्या खंडांत दैवी अथवा चिंतनात्मक सद्गुणांचें विवरण केलें असून त्याचा हेतु मोक्ष प्राप्त करून घेणें किंवा स्वतः ईश्वर होणें हा आहे. याहि खंडावर वेदांत तत्त्वज्ञानाची चांगलीच छाया पडलेली

दिसते. कारण प्राचीन अथवा अर्वाचीन काळांत यूरोपांत प्रचलित असलेल्या कोणत्याहि धर्मांत नराचा नारायण होऊं शकतो ही कल्पना मुळींच नाहीं. परंतु पायथॅगोरसनें हें तत्त्वज्ञान भारतांतून यूरोपांत नेलें, आणि तेथें तें प्रसृत करण्याचा आमरण प्रयत्न केला.

१ ते ४ या सूक्तांत आपणाहून जे श्रेष्ठ आहेत त्यांच्यासंबंधीं आपण कसा आचार ठेविला पाहिजे ह्याचें वर्णन केलें आहे. देव, धर्म, विभूति, संतमहात्मे, मातापितर हा उतरता सोपानक्रम योग्यच आहे. जशी ज्याची योग्यता आणि अधिकार तशी त्याची पूजा केली पाहिजे. ह्या सूक्तांचा भाष्यकार हायरोक्लीस म्हणतो, "धर्म जर आपणाला एक दिशा दाखवीत असेल आणि मातापितर जर दुसऱ्या मार्गानें जा म्हणतील, तर अशा प्रसंगीं आपण धर्माचेंच अनुसरण केलें पाहिजे. धर्माला सोडून मातापितरांचें जेवढें सांगणें असेल तेवढें ऐकूं नये." उदाहरणार्थ कुटुंबधर्मापेक्षां राष्ट्रधर्म केव्हांहि श्रेष्ठ असल्यानें केवळ कौटुंबिक हितासाठीं राष्ट्रहिताकडे पाहण्याची मुळींच आवश्यकता नाहीं असें म्हणून श्रेष्ठ कर्तव्य लक्षांत न घेतां मातापितर जर केवळ स्वार्थाचाच मार्ग चोखाळण्यास सांगतील, तर जेव्हां राष्ट्रासाठीं आत्माहुति करण्याचा

समय आहे तेव्हां मातापितरांची आज्ञा खुशाल झुगारून देऊन राष्ट्रधर्मास जागावें. पण आपल्या शारीरिक आणि इतर क्षुद्र सुखांच्या आड मातापितर येतात म्हणून त्यांचा अव्हेर करणें केव्हांहि गर्हणीय होय. मातापितरांसाठीं आपला वैयक्तिक स्वार्थ बाजूला सारून त्यांची सेवा आणि आज्ञापालन संतोषानें करावें. पण उच्चतर स्वार्थासाठीं किंवा नीतिभ्रष्ट मातापितर असतील तर त्यांची अवज्ञा करण्यास प्रत्यवाय नाहीं. 'त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत्' यांतील तत्त्व मनांत वागवून जें काय करणें असेल तें करावें.

५ ते ८ यांत मित्राची निवड करावयाची ती पारखून करावी, पण एकदां त्याची निवड केली कीं, संपत्ति, वैभव आणि अन्य नश्वर गोष्टी यांसाठीं त्याचा त्याग करूं नये असें सांगितलें आहे. मित्रत्वाचा पवित्र संबंध हा केव्हांहि चांगलाच राहिला पाहिजे. त्याच्याविषयीं अविश्वास, मत्सर अगर कमीपणा वाटूं लागला म्हणजे तो प्रेमसंबंध दुरावतो. म्हणून या तीन शत्रूंपासून आपण दूर राहिलें पाहिजे. मित्र व्यसनाधीन होत असेल तर आपण त्याला व्यसनापासून निवृत्त केलें पाहिजे. पण इतकेंहि करून तो बहकलाच तर त्याचा त्याग करण्यासहि मागें पुढें पाहूं नये. पण हायरोक्लीस म्हणतो कीं,

मित्रसंबंध राखण्याची आवश्यकता जर आपणांस पटेल तर तो संबंध आजन्म टिकेल. कारण आवश्यकता पटली कीं ती पुरविण्याचें सामर्थ्य आपोआपच उद्भूत होतें.

९ ते १४ हीं सूक्तें शारीरिक आणि मानसिक उन्नतीला पोषक अशीं असून स्वाभिमान ही सर्व सद्गुणांची जननी असल्यानें त्याची सर्वांआधीं जोपासना करण्यास सांगितलें आहे. 'बंधानापलीकडे' न जाण्याची यांत सूचना दिली आहे. नियमानें, न्यायानें वागण्याची यांत आज्ञा आहे, पण त्यांत घाण्याभोंवतीं फिरणाऱ्या बैलाप्रमाणें रूढीची झापड नसावी म्हणून विवेचक बुद्धीला दृष्टीआड करूं नका असें म्हटलें आहे.

१५ ते २०. जन्म म्हटला कीं मृत्यु आहेच. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्।' मग त्याची चिंता करून काय होणार? जें मिळवितां येतें तें नाहींसें होण्याचाहि संभव आहेच. आणि म्हणूनच तें चंचल होय. त्याच्याबद्दल हर्षविषाद मानण्याचें कारण नाहीं. सुखांप्रमाणें दुःखें हीं यावयाचींच. दारिद्र्य, आधिव्याधी, आप्तेष्टांचें मरण हीं खरीं दुःखेंच नव्हत. कारण तीं आत्म्याचें काडीमात्र वाकडें करूं शकत नाहींत. खडतर दुःखभोग भोगावा लागला तरी आपली धीरवृत्ति चळूं न देतां

दुःखाचा परिहार करण्याचा उद्योगच केला पाहिजे. 'यत्न तो देव जाणावा, अंतरीं धरतां बरें।'

२१ ते २३. आपलेंच म्हणणें खरें असा हट्ट नसावा. परमतसहिष्णुता असावी. दुसऱ्याचीं मतें ऐकून घ्यावींत; मग तीं खरीं असोत वा खोटीं असोत. मात्र त्यांत ग्राह्य कोणतीं आणि अग्राह्य कोणतीं याचा आपण विचार करावा.

२४ ते २६. ऐकावें जनाचें, करावें मनाचें.

२७ ते २९. एकदां हातांतून बाण सुटल्यावर मग 'अरेरे' म्हणून काय उपयोग? कर्म करण्याच्या आधींच विचार केला पाहिजे. नाहीं तर 'हासत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं।'

३०. अव्यापारेषु व्यापार होऊन इसापनीतींतील माकडाची गत व्हावयाची.

३१. नुसतीं सुखाचीं साधनें असून उपयोगीं नाहीं. त्या साधनांचा नीट उपयोग करण्याचें ज्ञान पाहिजे. दुधारी तरवार, अग्नि अथवा विष हीं तारकहि होतात आणि मारकहि होतात. उपयोग करणाऱ्याचें खरें शहाणपण. म्हणूनच श्रीमंत बापाचीं ऐदी पोरें व्यसनांत पडून सारी संपत्ति उधळतात आणि दुःखी होतात. महिना शंभर रुपये मिळविणाऱ्या चांभाराचीं

बायकापोरें घरीं अन्नवस्त्राविण तडफडतात, तर ३०-४० रुपये मिळविणारा कारकून सुखाचा प्रपंच करतो. म्हणून ज्ञान हेंच खऱ्या सुखास आवश्यक आहे.

३२ ते ३५. शारीरतप. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' 'निरोगी प्रकृति ही निर्वाणाप्रत जाण्याची पहिली पायरी आहे.' — भगवान् बुद्ध.

४० ते ४४. आपला मार्गदर्शक आपणच होऊन आपल्या कर्माकर्माची नित्य छाननी केली, प्रत्यहीं आत्मपरीक्षण केलें म्हणजे सर्व बाजूंनीं मनुष्य सुधारतो.

४५ ते ४७. येथें मानवी संपत्तीची शिकवण संपली. ती संपादिली म्हणजे पुढची दैवी संपत्ति मिळविण्याची पात्रता येते. पायथॅगोरसचा एकहि ग्रंथ उपलब्ध नाहीं. पवित्र चतुः-सूत्री हें त्याच्या मुख्य ग्रंथाचें नांव असावें आणि त्यावरूनच त्याच्या शिष्यांनीं हीं सूक्तें लिहिलीं असावींत.

४८ ते ७१. या दुसऱ्या खंडांत दैवी संपत्तीचें वर्णन असून तिचें फल मोक्ष हें आहे. स्वतः ईश्वर झाल्याशिवाय जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका होणार नाहीं असें यांत स्पष्ट सांगितलें आहे. भारतीय आर्यांच्या अध्यात्मिक ज्ञानाची पूर्ण छाया पायथॅगोरसच्या संप्रदायावर पडली आहे हें यावरून

उघड होतें. पायथॅगोरसनें आर्यतत्त्वज्ञनाचा यूरोपांत प्रसार करण्याचा जो यत्न केला त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे फिंटिअस, डॅमन यांच्यासारखे ऋषितुल्य पुरुष तिकडे निर्माण झाले हा होय. आर्यांच्या श्रेष्ठतम तत्त्वज्ञानाचें ग्रीकांना पूर्णपणें आकलन करतां आलें नाहीं, त्या तत्त्वबीजाचें तेथें विराट वृक्षांत रूपांतर झालें नाहीं तरी पायथॅगोरसचा आर्यतत्त्वज्ञानावर आधारलेला संप्रदाय तिकडे रूढ झाला व ग्रीकांच्या वाङ्मयांत त्याला महत्त्वाचें स्थान मिळालें, ही गोष्ट कांहीं कमी महत्त्वाची नाहीं. वैदिक तत्त्वज्ञानाचा तो एक विजयच समजला पाहिजे.

४८ ते ५३. या सूक्तांत प्रार्थना करण्याचें महत्त्व आणि त्याचें फल सांगितलें आहे. शरीरशुद्धीसाठीं जसें स्नान तशी मनःशुद्धीसाठीं प्रार्थना ही आवश्यक आहे. सार-असारांचें ज्ञान झालें असतां जें असार आहे, व जें मिळणें अशक्य आहे त्याची इच्छाच होणार नाहीं; आणि यालाच खरी निरीच्छता म्हणतात. ती अंगीं बाणली म्हणजे या जगांत कांहींच कमी पडत नाहीं. या व खालील सूक्तांच्या स्पष्टीकरणासाठीं स्वामी रामतीर्थ यांचे ग्रंथ वाचण्यासारखे आहेत.

५४ आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।

आपले मित्र आपणच आणि आपले शत्रूहि आपणच.—गीता.

सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता, परो ददातीति कुबुद्धिरेषा।
अहं करोमीति वृथाभिमानः, स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥

सुख किंवा दुःख दुसरें कोणी देत नाहीं; तसें मानणें म्हणजे मूर्खपणा होय. मी कर्ता हा अभिमान खोटा आहे. प्रत्येक मनुष्य आपल्या कर्मरूपी धाग्यानें बद्ध झाला आहे.

—आध्यात्म रामायण-

५५ ते ५६. तुझें आहे तुजपाशीं, परि तूं जागा चुकलाशी।

— तुकाराम.

देव जवळिं अंतरीं, भेटि नाहीं जन्मवरी।
मूर्ति त्रैलोक्यीं संचली, दृष्टि विश्वाची चुकली।
भाग्यें आले संतजन, झालें देवाचें दर्शन।
रामदासीं योग आला, देहीं देव प्रगटला ॥

५७ ते ६०. कांहीं आपत्ती अशा असतात कीं त्यांचा परिहार करणें मनुष्याला शक्य नसतें. या आपत्तींना दैवी आपत्ती म्हणतात. या दैवी आपत्तींना योगवासिष्ठांत मत्त बकऱ्याची उपमा दिली असून तो दैवरूपी बकरा पुष्कळदां मनुष्याच्या कर्तृत्वरूपी बकऱ्याला घायाळ करतो; मनुष्याचें त्याच्यापुढें कांहीं एक चालत नाहीं असें म्हटलें आहे. अशा

वेळीं 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' या न्यायानें मनुष्यानें अशा आपत्तींचा विचार न करणेंच चांगलें.

६१ ते ६८. सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा,
सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।
अंतःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो,
यं पश्यंति यतयः क्षीणदोषाः ॥

—मुंडक.

पायथॅगोरसच्या संप्रदायांत शुद्ध आचार आणि तपस्या यांना फार महत्त्व होतें. त्यासाठीं यमनियमांचा दण्डकहि होता. पायथॅगोरसनें शुद्धीचे देहशुद्धि आणि आत्मशुद्धि असे दोन भाग केले आहेत. युक्ताहारविहारानें देहशुद्धि होते; आत्मशुद्धि ध्यानधारणेनें आणि धर्माचारानें होते. याव्यतिरीक्त मुक्तीसाठीं तर्काची वा न्यायशास्त्राचीहि [Dialectics] आवश्यकता आहे असें त्याचें मत होतें. मनुष्याला मोक्ष पाहिजे असेल, ईश्वर व्हावयाचें असेल तर वरील तीनहि साधनें त्यानें संपादिलीं पाहिजेत. या तीन साधनांत देह, मन व बुद्धि यांचा समावेश आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

६९. आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥

७० ते ७१. आर्यांच्या अध्यात्मज्ञानाचा गड्डा जशाचा तसा पायथॅगोरसनें उचलून तो युरोपमध्यें नेला हें यावरून स्पष्ट होतें.

---

## स्पष्टीकरण—वाक्सुधा

पायथॅगोरसच्या संप्रदायांतील डेमॉक्रीटस नामक एका ऋषितुल्य ज्ञानी आणि आचारशील विभूतीनें ही वाक्सुधा लिहिली आहे. सुवर्णसूक्तांत पायथॅगोरसच्या संप्रदायाचीं मूल तत्त्वें, आचार आणि विचार यांसंबंधीं पूर्ण चर्चा झाली आहे. तींच तत्त्वें व तोच नीतिधर्म या वाक्सुधेनें दर्शित केला असल्यानें तिचें विशेष स्पष्टीकरण करणें आवश्यक नाहीं. केवळ तिजमधील महत्त्वाच्या वाक्यांना आमच्या ग्रंथांतील समानार्थक अवतरणें आवश्यक वाटलीं तेवढीं पुढें दिलीं आहेत.

३ श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ संपरिक्त्य विविनक्ति धीरः श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसो वृणीते प्रेयो मंदो योगक्षेमाद्वृणीते ॥

६ नाल्पे सुखमस्ति ।

८ विपदि धैर्यम् ।

१० सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म ॥

१२ क्षमा वीरस्य भूषणम् ।

१४ संत जेणें व्हावें । जग बोलणें सोसावें ॥

शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतिं मानावा उपदेश ॥
विश्व झालिया वन्ही । संतमुखें व्हावें पाणी ॥

१८. ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्माऽपि नरं न रंजयति ॥

७०. ज्ञानेन हीनाः पशुभिःसमानाः ॥

८४. नलिनीदलगतजललवतरलं । तद्वज्जीवितमतिशयचपलम् ।

---

## स्पष्टीकरण—हितबोध

८. जन्माला येतांना मनुष्य बरोबर कांहीं आणीत नाहीं व मृत्युनंतरहि तो आपल्या बरोबर कांहीं घेऊन जात नाहीं. जसा आला तसाच तो जाणार. म्हणून नश्वर वस्तूंच्या प्राप्ती-साठीं देवाची प्रार्थना करूं नये; आत्म्याची शाश्वत संपत्ति मिळविण्यासाठीं प्रार्थना करावी.

१०. तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम् ।

१८. 'दत्ता भवति विस्तृता' असें ज्ञानच होय.

२२. ग्रीक लोकहि अग्नीला हवन करीत असावेत असें दिसतें. किंवा पायथॅगोरसनें ही कल्पना भारतवर्षांतून तिकडे नेली असावी. तुलनात्मक प्राचीन धर्मशास्त्राचा अभ्यास केल्यास प्राचीन देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारावर नवा प्रकाश पडेल.

३५. मनःपूतं समाचरेत् ।

४५. मनुष्याला पुनर्जन्म आहे, आणि साधूंचें पालन व दुष्टांचें निर्दलन करण्यासाठीं ईश्वर भूतलावर अवतार घेतो, या दोन कल्पना आर्य धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याहि धर्मांत नाहींत. पायथॅगोरसनें त्या येथूनच तिकडे नेल्या.

----

## स्पष्टीकरण–उपमालंकार

११. मॅगपाय पक्षी हा कावळ्याच्या जातीचा असून त्याचीं पिसें रंगीत असतात. त्याचें वैशिष्टय म्हणजे अनावश्यक सुंदर वस्तूंचा संग्रह करणें व निरर्थक बडबड करणें. त्याच्या बडबडण्यानें रानावनांतील शांतिसाम्राज्य बिघडतें. वाचाळ माणसाच्या ठिकाणींहि सुभाषितांचा संग्रह असतो. पण वेळीं अवेळीं एकसारखा उपयोग करण्याच्या सवयीमुळें त्याच्या बोलण्यानें रसहानिच होते.

१६. बोजा म्हणजे सर्व शरीराचें वजन. त्याच्याखालीं जो मल्ल सांपडतो त्याला उठणें कठिण पडतें. मग उलट डाव करण्याचें नांव नको. मनुष्यानें देखील आपला उत्साह, उद्योग, धैर्य, चिकाटी वगैरे सद्गुणांचा भार दैवावर घातला म्हणजे त्याला देखील त्याच्याविरुद्ध कांहीं गडबड करतां येणार नाहीं.

२३. प्रख्यात ग्रीक महाकवि होमर याच्या ओडेसी नामक महाकाव्यांत या गायिकांचा उल्लेख आहे. त्यांना सायरन्स हें नांव असून समुद्रजलमार्गाच्या वाटेवर एका बेटावर त्या राहात असत. येणारें जाणारें एखादें जहाज दिसलें कीं त्या आपल्या मधुर आलापांनीं खलाशांना इतकें मोहून टाकीत कीं, ते आपलें जहाज त्या बेटाला लावीत व त्या गायिकांकडे जात आणि ते कायमचेच ! ओडेसी काव्याचा नायक युलीसस यालाहि त्या वाटेनें स्वदेशीं परत जावयाचें होतें. म्हणून त्यानें आपल्या खलाशांच्या कानांत गुडद्या घालून ते बंद केले व स्वतःला जहाजाला घट्ट बांधून घेतलें. सायरन्सचे आलाप त्याच्या कानीं पडतांच त्यानें त्यांच्याकडे जाण्यासाठीं खूप धडपड केली, पण त्याच्याच पूर्वसूचनेप्रमाणें आणि सर्व खलाशी बहिरे बनल्यानें त्यांनीं त्याच्या धमकावण्या आणि विनवण्या यांच्याकडे लक्ष दिलें नाहीं, व याप्रमाणें ते सर्व सायरन्सच्या तडाख्यांतून वांचले.

५५. पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ।।

## स्पष्टीकरण - नीतिबोध

२. धिग्बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजोबलं बलम् ।

३. जो स्वयेंचि कष्टत गेला । तोचि भला ॥

५. कारण मग एक घड ना भाराभर चिंध्या व्हावयाच्या.

१०. गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ।

४२. विद्वान्सर्वत्र पूज्यते ।

५३. प्लेटोः इ. स. पू. ४२९–३४७. एक महान् ग्रीक तत्त्ववेत्ता. आत्मा अमर आहे हा पायथॅगोरसचा सिद्धांत याला मान्य होता. 'प्लेटोज डायलॉग्ज' आणि 'रिपब्लिक' हे प्लेटोचे दोन ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत.

----

## स्पष्टीकरण– नवनीत

२५. न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने ।
प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ —योगवासिष्ठ

६६. हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।
तृष्णैका तरुणायते ।

७४. मतं यस्य न वेद सः ।

७५. देहो देवालयः प्रोक्तः ।

तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ।

## स्पष्टीकरण–लाक्षणिक बोल

१--२. देवाचें पूजन वा चिंतन हें अनन्य भक्तीनेंच केलें पाहिजे. नाहीं तर यंत्राप्रमाणें हात गंधफूल वाहण्याची क्रिया करीत आहेत, तोंडानें जप चालला आहे पण मन मात्र भलत्याच विचारांत गर्क! दुष्ट विचाराच्या लाटांनीं मानस समुद्र क्षुब्ध होऊन तो जर गढूळ झाला तर त्याच्या तळाशीं असणाऱ्या देवरत्नाची प्राप्ति होणार कशी? पूजनाच्या वेळीं मन शुद्ध, शांत आणि निर्विकार ठेवलें तरच खरें पूजन होऊन परमेशाचा लाभ होण्याची शक्यता. सांसारिक आणि पारमार्थिक विषयांची खिचडी करतां उपयोगी नाहीं. तापून लाल झालेलें लोखंडच तापून लाल झालेल्या दुसऱ्या लोखंडाशीं जोडतां येतें, तसें शुद्ध मनानेंच शुद्ध तत्त्वाची-परमेश्वराची जोड होणें शक्य आहे. म्हणून देवपूजा ही अव्यभिचारी भक्तीनेंच केली पाहिजे. नाहीं तर देवमंदिरांत जाऊन तेथेंहि संसारच करावयाचा असेल तर देवमंदिर बांधण्याचें प्रयोजन तरी काय?

३. यांतील तत्त्व सनातनी हिंदूंना कांहीं सांगावयास नको. कारण तें त्यांच्या पूर्ण आचारांत आहे. परमेश्वर हा एकच श्रेष्ठ असल्यानें त्याच्यापुढें आपण नम्रतेनें व निरहंकार-

पणें गेलें पाहिजे. तसेंच आपण आगंतुक वस्तूंचा आणि बंधनांचा त्याग करून शरीराचे दोष व मनाचे विकार घालवून देऊन त्याचें पूजन केलें पाहिजे. तनु, मन आणि धन ही त्रयी त्याला अर्पण केली पाहिजे. अनवाणीपणांत शरीर, होमहवनांत धन व पूजाविधींत मन यांचा समावेश केलेला आहे.

४. कारण मनुष्य हा सर्वस्वीं पंगु आहे. त्याची बुद्धि अल्प आहे, शरीर रोगग्रस्त आहे, मन चंचल आहे; तेव्हां परमेश्वराच्या विराट शक्तीचें आकलन त्याला कसें होणार ? तसेंच आध्यात्मिक संप्रदाय स्थापन करणाऱ्या ज्या थोर विभूती असतात, त्यांनीं आपले संप्रदाय स्थापन करण्यापूर्वीं संयमनपूर्वक दांडगी तपश्चर्या करून परमेश्वराची कृपा व ज्ञान संपादन केलेलें असतें. म्हणून त्यांनीं केलेल्या चमत्कारांविषयीं साशंक होण्याचें कारण नाहीं. उलट आपण श्रद्धेनें देवमार्ग धरला व एखाद्या आध्यात्मिक संप्रदायाला धरून आपलें आचरण ठेविलें, तर योग्य वेळीं आपणांला सम्यग्ज्ञान होऊन त्यांच्याविषयीं जो प्रथम अविश्वसनीय अद्भुतपणा वाटला तो वाटणार नाहीं. भगवंतांनीं म्हटलेंच आहे-

श्रद्धामयोऽयं पुरुषो योयच्छ्रद्धः स एव सः ॥

संशयात्मा विनश्यति ।
श्रद्धा हें जीवन व शंका हें मरण आहे.

५. सामान्य लोकांचा मार्ग हा मुख्यतः सांसारिक असतो. अर्थात् त्यांच्या वाटेनें गेल्यास लौकिक गोष्टींशिवाय दुसरें काय मिळणार? यास्तव लोकमताची उपेक्षा करून आपण आपल्यासाठीं स्वतंत्र मार्गच काढून देवत्व संपादन केलें पाहिजे.

६. पार्थिव देव म्हणजे माणसें. पण ज्याला मानवी पायरी चढून वर देवाप्रत जावयाचें आहे त्यानें भौतिक गोष्टींचा त्याग करून देवमार्गाचा अवलंब केला पाहिजे. देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगासी तुटी । सर्वहि अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥ ——रामदास

७. वाणीचें संयमन करून तिला बहिर्मुख होऊं न देण्याचा अभ्यास केला पाहिजे. बुद्धीच्या व मनाच्या बलांवर ही गोष्ट साध्य झाली म्हणजे मग तिला अंतर्मुख करणें व देवमार्गाला लावणें अगत्याचें आहे. कारण याशिवाय पूर्णत्व प्राप्त होणार नाहीं.

८. क्रोध हा जाळणारा आहे म्हणून त्याला अग्नीची व शब्द हा जखम करणारा आहे म्हणून त्याला तरवारीची उपमा देतात. पण क्रोधाग्नीचा उपशम शब्दशस्त्रानें होणार नाहीं.

उलट पहिल्याला दुसऱ्याचा इंधनाप्रमाणें उपयोग व्हावयाचा. एतदर्थ शहाण्यानें क्रोधिष्ट मनुष्याच्या तोंडास तोंड देऊं नये. कारण उत्तरास प्रत्युत्तर दिल्यानें क्रोधाचा पारा फारच चढतो व आपलें मनहि संतप्त व उद्विग्न होतें. यासंबंधीं मुक्ताबाईचा पूर्वीं ७०-७१ पानावर १४ व्या अंकाखालीं आलेला अभंग बोधप्रद आहे.

९. शिरका म्हणजे द्राक्षांपासून बनवलेली एक प्रकारची दारू. तिला जवळ करणें म्हणजे माणुसकी गमावून आक्काबाईला जवळ करणेंच होय. दारूनें मद चढतो. मदांध मनुष्य हा उकळत्या पाण्याच्या भांड्याप्रमाणें आहे. त्याचें मन स्वतःच्या मनोविकाराच्या उकळीपलीकडे जात नाहीं. तो शीघ्रकोपी व अविचारी बनतो, आणि त्या भरांत वाटेल तें अघोर कर्म करण्यास कमी करीत नाहीं. याचसाठीं दारू निषिद्ध मानली आहे.

१० ओझें उचलण्यांत उद्योग व उत्साह आहे तर तें खालीं ठेवण्यांत आळस व ढिलाई आहे. 'कष्टाविण फळचि नाहीं' हा सिद्धांत आहे. म्हणून स्वतः आळशी होऊं नका किंवा दुसऱ्यास बनवूं नका. 'आळस उदास नागवणा' असें रामदासांनींहि म्हटलें आहे.

११ उजवा व डावा हे दोन शब्द सदसदांचे निदर्शक आहेत. म्हणून जें शुभ आहे त्याचा सुष्ट भावानें अंगीकार करण्यास व जें अशुभ आहे तें नाहींसें करण्यास तत्पर असावें ही गोष्ट येथें सुचविली आहे.

१२ पायथॅगोरसचा विषय म्हणजे तत्त्वज्ञानाचा विषय. तो बुद्धिग्राह्य आहे. कोणासहि त्याची चर्चा करण्यास प्रत्यवाय नाहीं. पण चर्चा करावयाचीच असेल तर प्रथम बुद्धिबल संपादन करणें अवश्य आहे.

१३ तराजूची दांडी ही न्यायाची दर्शक आहे. कोणत्याहि बाबतींत आपल्या न्यायबुद्धीला जें योग्य व खरेंपणाचें वाटत असेल तेंच आपण प्रामाणिकपणानें आचरणांत आणलें पाहिजे.

१४ घर म्हणजे संसाराचें मूल स्थान. परमेश्वराच्या भेटीसाठीं किंवा ब्रह्मज्ञानासाठीं वैराग्य उत्पन्न होऊन जर संसाराचा त्याग केला तर तें वैराग्य व तो निश्चय कायम टिकला पाहिजे. पुनः म्हणून सांसारिक गोष्टींचा मोह होतां कामा नये. नाहीं तर प्रियजनांच्या मृत्यूनें स्मशानवैराग्य सर्वांनाच येतें. परंतु त्या प्रबल पण क्षणिक भावनेच्या भरांत जर संसार सोडला व संन्यास घेतला, आणि पुनः कालांतरानें मनाची ओढ संसाराकडे लागली तर संसारहि नाहीं व सर्वेश्वरहि

नाहीं अशी फसगत व्हावयाची. अरत्र ना परत्र अशा त्रिशंकू-सारख्या निरालंब स्थितींत सांपडण्याचा प्रसंग ओढवावयाचा. आणि मग पश्चात्तापरूपी जिवंत पिशाच्च पछाडल्याशिवाय राहील कसें ? ' ज्या दिवशीं वैराग्य होईल त्या दिवशींच घर सोडून बाहेर पडावें ' हें वेदवचन व ' प्रपंच सोडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ' हें समर्थांचें वचन यांतील अर्थांचें मर्म लक्षांत घेऊन शहाण्यानें वागावें.

१५ सूर्य म्हणजे ज्ञानदेवता, तिची आराधना चालली असतां पाशवी आचारविचार करणें अत्यंत निंद्य होय. अध्यात्म-शास्त्राचा अभ्यास चालला असतां हीन गोष्टींकडे पूर्ण दुर्लक्ष केलें पाहिजे.

१६ येथें कोंबडा म्हणजे शरीर असा अर्थ आहे. उन्नति मनाची असो, बुद्धीची असो अथवा आत्म्याची असो, या सर्वांचा आधार जें शरीर त्याचें पोषण उत्तम प्रकारें केलें पाहिजे. युक्ताहारविहारानें शरीराची सुस्थिति राखली तरच आत्मोन्नति करतां येणें शक्य आहे. अत्यशनानें किंवा अन-शनानें तें रोगग्रस्त वा निःसत्त्व करून कांहीं लाभ होणार नाहीं. शरीर हें देवालय समजून त्याची योग्य निगा राखावी. मात्र देवापुढें बलिदान करण्यांत मनुष्याची कांहीं तरी कामना

असते. अर्थात् सुखोपभोगासाठीं मनुष्यानें शरीर कष्टवूं नये असा याचा अर्थ आहे.

१७ वक्रनखी प्राण्यांना पाहिजे तो जिन्नस सहज घेतां येतो, पण देतां मात्र येत नाहीं, नखांतच अडकून राहतो. पण माणसांना परमेश्वरानें सरळ असे दोन हात दिले असूनहि जो वक्रनखी प्राण्याप्रमाणें स्वार्थीपणानें वागतो त्याला साहाय्य करण्यांत कांहींच पुण्य नाहीं.

१८ सत्य हें एकमेवाद्वितीय असें असून असत्याला मात्र मितीच नसते. म्हणून सत्याप्रत जाणारा मार्ग एकदां स्वीकारला कीं सरळ त्या मार्गानेंच गेलें पाहिजे. आखलेला रस्ता सोडून मोहवश होऊन भलत्याच मार्गाला लागूं नये.

१९ पाकोळी ही आळसाची मूर्तिमती प्रतिमा आहे. शिवाय तिचा शेजार हा अल्पकाल टिकणारा असतो. म्हणून तिच्यापासून कांहीं अपेक्षा करावी तर ती फोलच ठरावयाची. एवंच आळशी, कामकंटाळू व चंचल बुद्धीचा जो मनुष्य असेल त्याला आपल्या सांप्रदायांत घेऊं नये.

२० आंगठी ही शृंखलेप्रमाणें मनुष्याला बद्ध करतेच. पण तिचें वैशिष्ट्य हें कीं ती घालणाराला जाचक मुळींच वाटत नाहीं; उलट ती त्याला सुखद वाटते. आत्म्यालाहि जें

शरीराचें बंधन आहे तें असेंच गोड वाटत असतें. पण खरा विवेक करून आपण आपला आत्मा देहाच्या बंधनांतून मुक्त केला पाहिजे.

२१ पायथॅगोरसच्या सांप्रदायाचें मुख्य तत्त्व असें आहे कीं ईश्वर हा निराकार आहे. अर्थात् त्याची मूर्ति कोरणें व तिचें पूजन करणें हा त्यांच्या मतें शुद्ध वेडपणा होय.

२२ इंद्रियांच्या साहाय्यानें परमेश्वराचें सत्यस्वरूप कळणार नाहीं. वस्तुज्ञान हें इंद्रियांच्या प्रकाशांत होतें, पण हा इंद्रियांचा प्रकाश स्वयंसिद्ध नसून दिव्यासारखा उसना असल्यानें त्यांच्या साहाय्यानें स्वयंप्रकाश अशा परमेश्वराच्या स्वरूपाची ओळख करून घेण्याच्या अशक्यप्राय भानगडींत पडणें योग्य नव्हे.

२३ दुसऱ्याला हसणें हा मनुष्याचा एक स्वभाव आहे, आणि याच दृष्टीनें हसणारा प्राणी अशी त्याची व्याख्या केली आहे. पण ज्याला मनुष्यकोटींतून देवकोटींत जावयाचें आहे त्याला हा मनुष्यस्वभाव सोडून देऊन देवाचा कित्ता गिरविला पाहिजे. शिवाय हसणें हा एक मनोविकार असून तो थोडें सुख झालें तरी तोंडावर सहज उमटतो. म्हणून इतर विकारांना गौणत्व देऊन हास्यविकाराला प्राधान्य दिलें आहे.

मुमुक्षूनें सर्व विकार जिंकले तरच त्याला इच्छित फल मिळेल.

२४ शुचिर्भूत होऊनच धार्मिक क्रिया एकचित्तानें करीत असतां जर नखें काढण्यासारख्या अमंगल क्रिया करण्यांत हात गुंतले, तर आपलें चित्त तरी धार्मिक क्रियेकडे नीट कसें लागेल? पण या लाक्षणिक बोलाचा संबंध टीकाकार आये-म्ब्लीचस आप्तजनांकडे लावतो. आपले अगदीं जवळचे नातलग म्हणजे आईबाप, बहीणभाऊ हे शरीराच्या हस्तपादादि अवयवांसारखे असून आपला कोणताहि अवयव तोडला तर आपल्यास दुःख होतें, व म्हणून आपण दृढ संबंध असलेल्यां आपल्या मंडळीस कधीं तोडीत नाहीं. पण चुलत चुलत संबंधाचीं माणसें आणि त्यांचीं मुलें यांसारखी जी दूरच्या नात्याची मंडळी असतात, त्यांचा आपल्याशीं संबंध फार येत नसल्यानें त्यांना उत्सवप्रसंगीं विसरण्याची चूक आपल्या हातून होण्याचा संभव असतो. पण या मंडळींना आपण विसरूं नये. संबंध कधीं फारसा येत नाहीं म्हणूनच त्यांना समारंभप्रसंगीं आठवणीनें बोलावून त्यांच्याशीं घरोबा वाढवावा.

२५ विचार न करतां आपण कोणास साहाय्य केलें तर तें अनाठायीं होण्याचा संभव असतो. विशेषतः आध्यात्मिक बाबतींत एखाद्याला दीक्षा देऊन साहाय्य करावयाचें असेल

तर त्याची प्रथम चांगली परीक्षा केली पाहिजे. पायथॅगोरसचा असा दण्डकच होता कीं ज्याला त्याच्या संप्रदायांत यावयाचें असेल त्यानें यमनियमांचें पालन पांच वर्षें केलें पाहिजे. ब्रह्मचर्य, मौन व तत्सदृश इतर कडक नियम प्रथम आचरून त्यानें आपलें मुमुक्षुत्व सिद्ध केलें पाहिजे. या कडक परीक्षेंत उतरेल तोच मनुष्य आपल्या संप्रदायांत घेण्यास पात्र होय असें पायथॅगोरस समजत असे.

२६ अज्ञानरूपी झोंपेंतून उठून ज्ञानाच्या प्रकाशांत आल्यावर शारीरिक उपभोगांचें स्मरण देखील आपल्या स्मृति-पटलावरून पुसून-काढलें पाहिजे.

२७ काळीज खाऊं नका म्हणजे मत्सर करूं नका. मत्सरी मनुष्य हा आंतल्या आंत कुढत असतो. दुसऱ्याच्या संपत्तीचा हेवा करूं नये किंवा त्याच्या वैगुण्याचा आनंद मानूं नये. कारण दोहोंतहि आपल्या हृदयाचा अधःपात आहे.

२८ हृदयाप्रमाणें आपली बुद्धीहि उदार असावी. तसेंच आध्यात्मिक तत्त्वें व ग्रंथ हे विचारपूर्वक लिहिलेले व स्वानु-भवसिद्ध असतात. म्हणून त्यांच्या अर्थाची ओढाताण करूं नये किंवा भलताच अर्थ काढूं नये. शिवाय मेंदू म्हणजे ज्ञानाचें कुंड आहे. तो आपण पवित्र राखला पाहिजे.

२९ एरीथीनस नांवाचा तांबडा मासा बुद्धिहीन आणि विचारहीन असतो.

३०–३१ आपल्या स्मृतिकारांनींहि अनेक खाद्य पदार्थ निषिद्ध मानले आहेत. ते पदार्थ चवीला किंवा शरीरबल-पुष्टीला चांगले असले तरी आत्मिक बुद्धिविकासाला अपाय-कारक असतात. कांहीं आधुनिक पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं अनेक प्रयोग करून आहाराचा परिणाम जसा शरीरावर तसा बुद्धी-वरहि होतो व मांसाहारापेक्षां शाकाहार चांगला हें सिद्ध केलें आहे. भगवद्गीतेंतहि सात्त्विक आहाराची महति सांगितली आहे. ‘ आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा मतिः ।’

REFBK-0006134